# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक २९-१२-२०१६ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

गुरूवार दिनांक २९ डिसेंबर २०१६ रोजी (का.प.क्र ३३) मा.महापौर श्री. भगवान (बापू) देविदास घडमोडे यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे सकाळी ११-०० वा वंदेमातरम् या गीताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त श्री.ओम प्रकाश बकोरीया,आयएएस, नगर सचिव, श्री.डी.डी.सुर्यवंशी व संबंधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १. | स.स. श्रीमती स्मिता दिगंबर घोगरे |
| २. | स.स. श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल |
| ३. | स.स. श्री.मनगटे गजानन भानुदास |
| ४. | स.स. श्री.जाधव बन्सी ग्यानू |
| ५. | स.स. श्री.वाघमारे रुपचंद लक्ष्मण |
| ६. | स.स. श्रीमती ज्योती जयेश अभंग |
| ७. | स.स. श्री.राजगौरव हरिदास वानखेडे |
| ८. | स.स. श्रीमती रोजतकर पुष्पा उत्तमराव |
| ९. | स.स. श्री.विजय साईनाथ औताडे |
| १०. | स.स. श्री.सुरे सीताराम इसराम |
| ११. | स.स. श्रीमती स्वाती किशोर नागरे |
| १२. | स.स. श्री.खान अय्युब म.हुसेन खान |
| १३. | स.स. श्री.सचिन सुर्यकांत खैरे |
| १४. | स.स. श्री.शेजवळ सुभाष सयाजी |
| १५. | स.स. श्री.रावसाहेब राधाकिसन आमले |
| १६. | स.स. श्रीमती लोखंडे मनिषा विनोद |
| १७. | स.स. श्रीमती दाभाडे प्रेमलता मिलींद |
| १८. | स.स. श्री.अफसर खॉन यासीन खॉ |
| १९. | स.स. श्री.कादरी जमीर अहेमद रहीम अहेमद |
| २०. | स.स. श्री.सय्यद मतीन रशीद |
| २१. | स.स. श्रीमती तसनीम बेगम अ.रऊफ |
| २२. | स.स. श्रीमती खान सायरा बानो अजमल |
| २३. | स.स. श्रीमती सय्यद सरवतबेगम आरेफ हुसैनी |
| २४. | स.स. श्री.सिद्दीकी नासेर तकीउद्दीन |
| २५. | स.स. श्रीमती शेख नरगीस सलिम |
| २६. | स.स. श्री.खान जहांगीर मुलानी |
| २७. | स.स. श्रीमती शोभा नारायणराव वळसे |
| २८. | स.स. श्रीमती ज्योती सुभाष पिंजरकर |

| | |
|---|---|
| २९. | स.स. श्रीमती शबनम बेगम कलीम कुरेशी |
| ३०. | स.स. श्रीमती संगिता सुभाष वाघुले |
| ३१. | स.स. श्री.मलके गोकुलसिंग संपतसिंग |
| ३२. | स.स. श्रीमती सुरेखा बाळासाहेब सानप |
| ३३. | स.स. श्रीमती वैशाली कारभारी जाधव |
| ३४. | स.स. श्री.शिंदे राजु रामराव |
| ३५. | स.स. श्रीमती खरात सुरेखा गौतम |
| ३६. | स.स. श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी |
| ३७. | स.स. श्री.खान इरशाद इब्राहिम |
| ३८. | स.स. श्रीमती नसीम बी सांडु खॉ |
| ३९. | स.स. श्री.अजीम अहेमद रफीक |
| ४०. | स.स. श्रीमती खतीजा कुरैशी छोटू कुरैशी |
| ४१. | स.स. श्री.खान फेरोज मोईनुद्दीन |
| ४२. | स.स. श्री.तनवाणी राजु लेखराज |
| ४३. | स.स. श्री.ढगे गंगाधर नामदेव |
| ४४. | स.स. श्रीमती खान नसरीन बेगम समद यारखॉ |
| ४५. | स.स. श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे |
| ४६. | स.स. श्रीमती चावरीया बबीता विजय |
| ४७. | स.स. श्री.भादवे रामेश्वर बाबुराव |
| ४८. | स.स. श्री.बल्लाळ मनोज आसाराम |
| ४९. | स.स. श्रीमती मलेका बेगम हबीब कुरैशी |
| ५०. | स.स. श्रीमती शेख समिना शेख इलियास |
| ५१. | स.स. श्री.जायभाय रमेश भानुदास |
| ५२. | स.स. श्री.शेख जफर अखतर |
| ५३. | स.स. श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख |
| ५४. | स.स. श्री.दांडगे शिवाजी भाऊसाहेब |
| ५५. | स.स. श्रीमती देसरडा राखी प्रशांत |
| ५६. | स.स. श्रीमती जोहरा बी नासेर खान |
| ५७. | स.स. श्री.खैरे ऋषिकेश चंद्रकांत |
| ५८. | स.स. श्रीमती रेशमा अशफाक कुरेशी |
| ५९. | स.स. श्री.बारवाल गजानन रामकिसन |
| ६०. | स.स. श्रीमती वाडकर शिल्पाराणी सागर |
| ६१. | स.स. श्रीमती बनकर विजया संजय |
| ६२. | स.स.श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे |
| ६३. | स.स. श्रीमती विधाते अंकिता अनिल |
| ६४. | स.स. श्रीमती कुलकर्णी जयश्री सुरेंद्र |
| ६५. | स.स. श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत |
| ६६. | स.स. श्रीमती देशमुख माधुरी मिलींद |

| | |
|---|---|
| ६७. | स.स. श्रीमती नरोटे कमल रामचंद्र |
| ६८. | स.स. श्री.जगताप कमलाकर शामराव |
| ६९. | स.स. श्री.सोहेल शकील शेख |
| ७०. | स.स. श्रीमती ज्योती सुनिल नाडे |
| ७१. | स.स. श्रीमती मुंढे मनिषा बाळासाहेब |
| ७२. | स.स. श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड |
| ७३. | स.स. श्रीमती मिना रामदास गायके |
| ७४. | स.स. श्री.पवार आत्माराम माणिकराव |
| ७५. | स.स. श्रीमती मोरे ज्योती राजाराम |
| ७६. | स.स. श्रीमती चक्रनारायण सीमा काहानुलाल |
| ७७. | स.स. श्री.थोरात दिलीप गंगाधर |
| ७८. | स.स. श्रीमती अर्चना शैलेंद्र निळकंठ |
| ७९. | स.स. श्रीमती सुमित्रा गिरीजाराम हाळनोर |
| ८०. | स.स. श्रीमती निकाळजे लता मगन |
| ८१. | स.स. श्री.सोनवणे राहुल पंढरीनाथ |
| ८२. | स.स. श्री.सिद्धांत संजय शिरसाट |
| ८३. | स.स. श्री.अब्दुल मं.नाविद अब्दुल रशीद |
| ८४. | स.स. श्रीमती विमल जनार्धन कांबळे |
| ८५. | स.स. श्री.घोडेले नंदकुमार राधाकिसन |
| ८६. | स.स. श्रीमती मुल्ला सलीमा बेगम खाजोददीन |
| ८७. | स.स. श्रीमती शोभा गरुलिंगअप्पा बुरांडे |
| ८८. | स.स. श्रीमती सलीमा बाबुभाई कुरेशी |
| ८९. | स.स. श्री.जंजाळ राजेंद्र हिम्मतराव |
| ९०. | स.स. श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण |
| ९१. | स.स. श्री.अप्पासाहेब विनायक हिवाळे |
| ९२. | स.स.कु.जमादार सायली भागवत |

नामनिर्देशित पालिका सदस्यांची नावे

१. श्री.शेख अब्दुल ताहेर अब्दुल करीम
२. श्री.घोडके कचरु छगनराव
३. श्रीमती आऊलवार सुनिता तुकाराम
४. श्री.कांबळे चेतन जनार्धन
५. श्री.चंदु किशनचंद तनवाणी

श्री.मकरंद कुलकर्णी :स.माजी सभापती व सदस्य श्री. काशिनाथ कोकाटे यांचे वडील स्व.हरीभाऊ कोकाटे यांचे दु:खद निधन झाले श्रध्दाजंली अर्पण करावी.

श्री.गजानन बारवाल :मध्यप्रदेशचे माजी मुख्यमंत्री श्री.सुरेंद्रजी पटवार यांचे निधन झाले श्रध्दांजली अर्पण करावी.

यास स.सदस्य श्री. कैलास गायकवाड श्री. रेणुकादास वैद्य श्रीमती अंकिता विधाते यांनी अनुमोदन दिले.

मा.महापौर :ठिक आहे सर्वांनी श्रध्दांजली साठी उभे रहावे.

यावेळी स्व.हरीभाऊ कोकाटे, स्व.सुरेंद्रजी पटवार, यांचे निधन झाल्याने त्यांना सभागृहाच्या वतीने दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अपर्ण करण्यात आली.

श्री.नंदकुमार घोडेले :औरंगाबाद विभागीय आयुक्त पदी श्री.पुरूषोत्तम भापकर यांची नियुक्ती झालेली आहे. अभिनंदनाचा ठराव घेण्यात यावा. तसेच मा.श्री.उमाकांत दांगट सेवानिवृत्त होत आहे त्यांचेही मोठे सहकार्य लाभले त्यांचे आभार व्यक्त करावे.

श्री.प्रमोद राठोड :यास अनुमोदन आहे.

श्री.अफसर खान :कोरम नाही.

मा.महापौर :श्री.पुरूषोत्तम भापकर साहेब यांनी या महापालिकेत चांगले काम केलेले होते. त्यांची विभागीय आयुक्त पदी नियुक्ती झाली. त्यांचे अभिनंदन करण्यात येते. श्री.दांगट साहेब यांनी चांगले काम केले. त्यांचे आभार व्यक्त करण्यात येते. दहा मिनिटासाठी सभा तहकूब करण्यात येते. (वेळ ११-०५ वा.पुन्हा ११-१५ वा.सभेला सुरूवात).

श्री.अफसर खान :साऊंड सिस्टम व्यवस्थीत करावी. ज्यांना यापोटी भाडे देण्यात आले. तेवढ्या खर्चात मनपाच्या स्वत:चे साऊंड सिस्टम अद्यावत करता आले. असते याचा विचार करावा.

मा.महापौर :याकडे काळजीपुर्वक लक्ष द्यावे. प्रशासनाने दखल घेण्यात यावी.

श्रीमती किर्ती शिंदे :महाराष्ट्र शासनाने ओबीसी समाजासाठी स्वतंत्र मंत्रालय ओपन केले. त्याबद्दल राज्याचे मा.मुख्यमंत्री महोदय यांचे अभिनंदन करावे.

मा.महापौर :मा.मुख्यमंत्री श्री.देवेंद्रजी फडवणीस यांचे अभिनंदन करण्यात येते. तसा प्रशासनाने पत्रव्यवहार करावा.

**<u>विषय क्रमांक ८१४:-</u>**

बुधवार दिनांक १४.१२.२०१६ (का.प.क्र.-३२) रोजीच्या विशेष बैठक/सभेचे इतिवृत्त कायम करणे.

श्री.राजू शिंदे :जे इतिवृत्त सादर केले. त्यापुर्वीच्या सभेचे इतिवृत्त आलेले नाही. मागिल सभेचे इतिवृत्तांस मान्यता दिली नाही त्यास कायम करण्यात येऊ नये विषय क्रमांक ७८१,७८२ या विषय त्या सभेत होते. त्या इतिवृत्तास मान्यता देऊ नये. चर्चा करावी त्यानंतरच मान्यता द्यावी.

मा.महापौर :आताच सुचना केल्यानुसार इतिवृत्तांवर चर्चा करायची असे म्हटले. त्यात दुरूस्ती करता येते. नियमानुसार किती दिवसात तो विषय चर्चेला घेता येईल? प्रशासनाने चर्चेसाठी तो विषय ठेवावा. तेंव्हा त्या इतिवृत्तास मंजूरी देऊ.

श्री.नंदकुमार घोडेले :त्या विषयाचे इतिवृत्त समोर नाही. ७८१,७८२ कोणते विषय होते. सचिव यांनी सांगावे कोणते विषय होते.

श्री.राजू शिंदे :७८१,७८२ हे प्रशासनाने ठेवलेले भुमिगत गटार योजनेचे विषय होते. ते विषय असलेले इतिवृत्त कायम करू नये.

श्री.नंदकुमार घोडेले :एकदा विषय मंजूर झाल्यानंतर कायम होण्यास किती कालावधी लागतो? दुरूस्ती, स्थगिती करता येते का नियमात काय आहे?

मा.महापौर :प्रशासनाने त्यावर विचार करून किती दिवसापर्यंत चर्चा करता येते? माहिती द्यावी. तोपर्यत ते विषय स्थगित ठेवावे.

| | |
|---|---|
| श्री.त्र्यंबक तुपे | :मागिल निर्णय काय होता चर्चा करायची असेल किती दिवसानंतर पर्यत चर्चा घेता येतात नियमात काय आहे. |
| श्री.राजू शिंदे | :इतिवृत्त कायम करण्याकरीता समोर आले पाहिजे. त्यावर दुरूस्ती करायची असेल तर चर्चा होते. नसता, ते कायम केले जाते. एकतर त्या इतिवृत्तांवर चर्चा व्हावी किंवा त्यास स्थगिती द्यावी. मागिल १ वर्षाचे इतिवृत्त कायम करण्यासाठी आलेले होते. त्यास मंजूरी दिली होती. परंतु आता ७८१, ७८२ विषय असलेले इतिवृत्त चर्चा झाल्याशिवाय मंजूर करू नये. |
| श्री.राजेंद्र जंजाळ | :सभा कामकाजाच्या जादा तरतुदीमध्ये काय तरतुद आहे? खुलासा घ्यावा. ज्या शंका असतील त्या दुर होतील. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :इतिवृत्तांत प्रीटींग चुक असेल तर दुरूस्त करू शकतो. बदल करण्याचे अधिकार नाही. नियमानुसार जे असेल ती कार्यवाही करावी. जे विषयाबाबत आताच म्हटले या संदर्भात मा.मुख्यमंत्री महोदय यांचेकडे तक्रार केली आहे त्याची पोच आली आहे. जे काही करायचे आहे ते नक्कीच करू. मी स्वत: सी एम साहेबांशी चर्चा केली. २-३ आमदार यांना बोललो. त्या बाबत एलएक्यू करण्याचा प्रयत्न आहे. इतिवृत्त पेंडीग न पडता त्यास मंजूरी द्यावी. |
| मा.महापौर | :प्रशासनाला आदेशीत केले की यावर नियमानुसार किती दिवसात चर्चा करता येते? त्याचा खुलासा करावा. ते विषय स्थगित ठेवून चर्चा करावी. ज्या वेळेस नियमानुसार चर्चा करता येईल त्या वेळस, |
| नगर सचिव | :सभा कामाकाज नियमावली १ (र) नुसार महापालिकेने पारीत केलेला कोणताही ठराव तो पारीत झाल्यानंतर तीन महिन्यांच्या आत फेरबदल करता येणार नाही किंवा तो रद्द करता येणार नाही. मात्र अशा ठरावात एकूण पालिका सदस्यांपैकी कमीत कमी एक द्वितीयांश पालिका सदस्यांनी किंवा कोणत्याही विवक्षित बाबतीत या अधिनियमांन्वये आवश्यक असेल अशा अधिक संख्येइतक्या सदस्यांनी पाठिंबा दिलेल्या आणि सभेत संमत झालेल्या ठरावाने फेरबदल करता येईल किंवा तो रद्द करता येईल. खंड (ह) मधील आवश्यक गोष्टी पूर्ण करून अशा सभेची नोटीस देण्यात आली पाहिजे. आणि अशा नोटिशीत ज्या ठरावात अशा सभेत फेरबदल करण्याचे किंवा तो रद्द करण्याचे योजिले असेल, तो ठराव आणि अशा ठरावात फेरबदल करण्यासाठी किंवा तो रद्द करण्यासाठी असलेली सुचना किंवा प्रस्ताव पुर्णपणे नमूद केला पाहिजे. |
| मा.महापौर | :इतिवृत्तांवर आपले ऑब्जेक्शन आहे ते मान्य करून इतिवृत्तांवर नियमानुसार किती दिवसात चर्चा करता येते. प्रशासनाने खुलासा केलेला आहे. आपण दुरूस्ती करू शकतो. त्यावर तीन महिन्यात चर्चा करू शकतो. त्या नियमानुसार त्यावर चर्चा करण्यात येईल. |

**ठराव:-**

बुधवार दिनांक १४.१२.२०१६ (का.प.क्र.-३२) रोजीच्या विशेष बैठक/सभेचे इतिवृत्त कायम करण्यास मंजुरी देण्यात येते.

**विषय क्रमांक ८१५:-**

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक स्वमअ-२०१५/

प्र.क्र.२४९/नवि-३४,दिनांक १९.११.२०१५ नुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीचा आढावा घेणे.

अहवाल सादर करण्यात येतो की, देशातील सर्व शहरे हागंदारी मुक्त करून शहरातील घनकचऱ्याचे व्यवस्थापन करण्यासाठी केंद्र शासनाने स्वच्छ भारत अभियान (नागरी) दिनांक ०२ ऑक्टोबर,२०१४ पासून राबविण्यास सुरुवात केली आहे. केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्यामध्ये स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) ची अंमलबजावणी सुरु केली आहे. त्यानुसार औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रामध्ये अंतर्गत जे नागरीक उघडयावर शौचास जाण्याची पध्दत वापरतात व ज्या नागरीकांकडे वैयक्तिक शौचालय नाही फक्त अशाच नागरीकांना सदर योजनेतुन वैयक्तिक शौचालयाच्या बांधकामासाठी शासना मार्फत रक्कम रुपये १२,०००/- प्रति शौचालय एवढे अनुदान उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. सदर अनुदानामध्ये केंद्र शासनाच्या हिस्सा रक्कम रु.४०००/- व राज्य शासनाचा हिस्सा रक्कम रु.८०००/- इतका आहे. या संदर्भाने सदरील अभियानाअंतर्गत औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे कार्यवाही करण्यात येत असून आतापर्यंत झालेल्या कामाचा प्रगती अहवाल खालील प्रमाणे आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेमार्फत वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी अनुदानास पात्र लाभार्थ्यांची निवड करण्याची कार्यवाही सुरु असून आजपर्यंत ४२३१ लाभार्थ्यांची निवड करण्यात आलेली आहे. त्यापैकी सुमारे ३९१४ लाभार्थ्यास अनुदान पहिला हफ्ता रक्कम रु.६०००/- प्रति लाभार्थी इतका त्यांच्या बँकेच्या खात्यामध्ये RTGS द्वारे जमा करण्यात आलेला आहे. उर्वरित ३१७ पात्र लाभार्थी यांना पहिल्या हफ्त्याची रक्कम RTGS करणेची कार्यवाही सुरु आहे. आतापर्यंत लाभार्थ्यास पहिला हफ्त्याच्या अनुदाना पोटी एकुण रक्कम रु.२,३४,८४,०००/- इतकी वितरीत करण्यात आलेली आहे.

तसेच आजपर्यंत एकुण २४२० लाभार्थ्यांनी शौचालय बांधकाम पूर्ण केलेले असून ८७० लाभार्थ्यांचे शौचालयाचे बांधकाम सुरु आहे. तसेच ६२४ लाभार्थ्यांमार्फत शौचालयाचे बांधकाम सुरु करून घेण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. बांधकाम पूर्ण केलेल्या १४५५ लाभार्थ्यास अनुदानाचा दुसरा हफ्ता रक्कम रु.६०००/- प्रति लाभार्थी इतका यांच्या बँकेच्या खात्यामध्ये RTGS द्वारे जमा करण्यात आलेला आहे. उर्वरीत ९६५ लाभार्थ्यांना दुसऱ्या हफ्त्याची रक्कम RTGS करणेची कार्यवाही सुरु आहे. आतापर्यंत एकूण १४५५ लाभार्थ्यास दुसऱ्या हफ्त्याच्या अनुदाना पोटी एकुण रक्कम रु.८७,३०,०००/- इतकी वितरीत करण्यात आलेली आहे. पहिल्या व दुसऱ्या हफ्त्याच्या अनुदाना पोटी एकूण रक्कम रु.३,२२,१४,०००/- इतकी वितरीत करण्यात आलेली आहे.

आजपर्यंत एकूण ४२२८ लाभार्थ्यांचे फॉर्म तसेच शौचालय बांधकाम पूर्ण झालेल्या २४२० लाभार्थ्यांपैकी २११० लाभार्थ्यांच्या शौचालय बांधकामाचे फोटो शासनाच्या वेबसाईटवर अपलोड करण्यात आलेले आहेत. उर्वरित लाभार्थ्यांच्या शौचालय बांधकामाचे फोटो व फॉर्म अपलोड करण्याची कार्यवाही सुरु आहे.

तसेच शहरातील ज्या भागात open defecation चे प्रमाण जास्त आढळून आले आहे. अशा भागात सर्व्हेक्षण करून चार स्थळे अनुक्रमे १) आंबेडकरनगर, २) मिसरवाडी, ३) हर्षनगर, फाजलपुरा व ४) शताब्दीनगर या भागात सार्वजनिक वापरासाठी शौचालय बांधणे व केवळ महिला करीता एकुण सहा ठिकाणी शौचालय बांधकाम करण्यासाठी महानगरपालिकेने रक्कम रु.१३५.०० लक्षच्या निविदा काढण्यात आलेल्या आहेत. तसेच आणखी चार ठिकाणी Pay & Use तत्वावर सुलभ शौचालय बांधण्यात येणार आहेत. अशी एकुण १४ पब्लीक टॉयलेटची कामे हाती घेण्यात येणार आहेत. या अंतर्गत एकूण १०० बैठकीचे (seats) नियोजन केलेले आहे. कार्यादेश झाल्यानंतर कामे हाती घेण्यात येतील. करीता, अहवाल मा.सर्वसाधारण सभे समोर माहितीस्तव सादर.

श्री.मकरंद कुलकर्णी :या विषयाच्या अनुषंगाने आतापर्यंत काय काय कामे केली? सविस्तर प्रस्ताव मांडावा.

श्री.गजानन बारवाल :दोन महिन्यात स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत काय काय कामे केली? आढावा म्हणजे काय केले? माहिती द्यावी.

श्री.नंदकुमार घोडेले :असे अभियान राबवित असतांना पुर्वीची परीस्थिती व आताची परीस्थिती कशी आहे. याची तुलनात्मक माहिती द्यावी. पुर्वी किती कचरा उचलत होतो. आता किती उचलतो? बदल काय झाले? नियोजन काय केले? किती कर्मचारी काम करतात? वाढीव कर्मचारी किती दिले? होणारा खर्च व शासनाकडून मिळालेले अनुदान व शासनाकडे यासाठी अनुदान मिळावे यासाठी किती प्रस्ताव पाठविले? त्याचे काय झाले? एकामहिना भरात काय काम होते? सविस्तर टिप्पणी द्यावी.

श्रीमती माधुरी देशमुख :या अभियानासाठी आलेले अनुदान केलेला खर्च व केलेल्या उपाय योजनाची माहिती प्रत्येक बैठकीमध्ये यावी.

श्री.गजानन मनगटे :प्रस्ताव महत्वाचा आहे स्वच्छ महाराष्ट्र अभियान मार्फतच स्मार्ट सिटीकडे वाटचाल करणार आहोत. उपाय योजना केल्या का? ओला सुका कचरा जमा होतो का? किती वाहने वाढविली? नारेगाव येथे जाणारा कचरा किती कमी झाला? सविस्तर माहिती दिली नाही. सर्व माहिती द्यावी.

मा.महापौर :हा विषय महत्वाचा, शहराची वाटचाल या अभियान माध्यमातून होणार आहे. सविस्तर पावर पॉईन्ट प्रेझेन्टेशन नुसार माहिती द्यावी.

श्री.अब्दुल नाईकवाडी :५० वॉर्ड कचराकुंडी मुक्त केले असे म्हटले आहे याची यादी समोर यावी.

मा.आयुक्त :केंद्र शासनाची ही महत्वाकांक्षी योजना आहे. शहरात स्वच्छ अभियानाची सुरूवात २ ऑक्टोबर २०१४ पासून सुरू झाली. २ ऑक्टोबर २०१९ पर्यंत महात्मा गांधी यांची १५० वी जयंती रोजी भारत देश स्वच्छ व हागणदारी मुक्त करावयाचा आहे.

श्री.प्रमोद राठोड :आपणाशी चर्चा केली होती. त्याप्रमाणे काम व्हावे.

श्री.रेणुकादास वैद्य :काय अडचण आहे आम्हाला कळू द्यावे.

श्री.दिलीप थोरात :जो सभागृहाचा नियम नुसार कामकाज व्हावे. एकमेव मा.महापौरच पिठासीन अधिकारी असतात. बाकीचे सर्वांनी उभे राहूनच बोलले पाहिजे. ही आमची मागणी आहे. नियम काय आहे. सचिव यांनी सांगावे.

मा.महापौर :पावर पॉईन्ट प्रेझेन्टेशन एकदा घेऊ.

श्री.अब्दुल नाईकवाडी :मा.महापौर हे इतरांना खाली बसून बोलण्याची परवानगी देऊ शकतात.

श्री.प्रमोद राठोड :मा.महापौरांचा मान ठेवला पाहिजे. उभे राहून इतरांनी बोलले पाहिजे.

श्री.दिलीप थोरात :मा.महापौरांना अधिकार नक्कीच आहे. सभागृहाची एक शिस्त आहे ती पाळली पाहिजे.

श्री गंगाधर ढगे :यापुर्वी शिस्तीचे पालन झाले नाही का? अगोदरचे आयुक्त खाली बसूनच बोलत होते त्यांचे वेळेस शिस्त नव्हती का? हे आयुक्त खाली बसून बोलले तर काय हरकत आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :राज शिष्टाचार काय आहे. नियम काय सांगतो? सचिव यांनी खुलासा करावा.

मा.महापौर :सभा दहा मिनिटासाठी तहकूब करण्यात येते. (वेळ ११-४० वा. पुन्हा सभेला सुरूवात ११-५० वा.)

श्री.गंगाधर ढगे :सभेचे कामकाज नियमाने व्हावे. अशी सुचना केली. परंतु ४-५ दिवसांपुर्वी भाजपा पक्षाचे काही लोकांनी मा.महापौर, उपमहापौर, मा.आयुक्त, सचिव यांचे आसनावर बसून या सभागृहात बैठक घेतली ती योग्य होती का?

श्री.दिलीप थोरात :जो विषय चालू आहे. त्या बाबत अगोदर खुलासा करावा.

मा.महापौर :शांततेत सदस्यांनी आपला मुद्दा मांडावा.

श्री.राजू शिंदे :कोणती बैठक कुठे घ्यायची हा पिठासीन अधिकारी यांचा अधिकार आहे. आजचा तो विषय नाही. नगरसेवक व आयुक्त हे सदस्य असतात नियम व शिष्टाचार काय दर्शवितो ते वाचून दाखववे.

मा.महापौर :सचिव यांनी खुलासा करावा.

नगरसचिव :नियम १६ मध्ये दिले की, भाषण करतांना सभासदांनी उभे राहिले पाहिजे व सभापतींनी विनंती केल्यास सभासंदानी ताबडतोब खाली बसले पाहिजे.

श्री.राजू शिंदे :सभागृहामध्ये सर्वोच्च पद मा.महापौर यांचे आहे. शहराचे प्रथम नागरीक म्हणून मा.महापौर असतात. प्रथम नागरीक व महापौर म्हणून सर्वांनी मान ठेवणे. हे अधिकारी व नगरसेवकाचे कर्तव्य असे दिले आहे. नियमाचे पालन करणार की नाही. नियमाने सर्व कारभार चालावा. नगरसेवक व आयुक्त हे सभागृहाचे सदस्य असतात. पिठासीन अधिकारी यांनी परवानगी दिली असेल, तरच खाली बसून बोलले पाहिजे.

मा.आयुक्त :आतापर्यत जेवढ्या सभा झाल्या. त्यामध्ये बसूनच खुलासा केलेला आहे.

श्री.राजू शिंदे :यापुर्वी काय झाले ते बोलू नये. सभागृहाचे कामकाज नियमानुसार व्हावे. सभागृहाचा, मा.महापौराचा मान ठेवला जात नसेल तर नियमाला अर्थ राहणार नाही. सभागृहाचा हक्क भंग होतो. शासनास कळवावे. आदेश दिल्यानंतर उभे राहून बोलत नसेल तर ही कार्यवाही करावी.

मा.महापौर :हा मान सन्मानाचा विषय आहे. तो आपण करावा.

श्री.राजू शिंदे :मान सन्मानाचा विषय नाही हा राजशिष्टाचाराचा विषय येतो. विधान सभेमध्ये विधान सभा अध्यक्षासमोर जेवढ्या वेळेस बोलायचे असेल त्यावेळी मुंख्यमंत्री महोदय सुध्दा उभे राहून बोलतात. हा पिठासीन अधिकारी यांचा अधिकार आहे नियम काय सांगितले आहे ते सांगावे. सर्व नियमाचे पालन करून काम होत असेल तर यासाठीचा जो नियम आहे. त्याचे पालन करूनच काम करावे. मा.महापौर यांनी बसून बोलावे. असे म्हटले तर त्यांनी बसून बोलावे. आमची हरकत असणार नाही.

मा.महापौर :आयुक्तांनी आताच म्हटले की यापुर्वी बसूनच बोलत होतो.स्वच्छ महाराष्ट्र अभियान महत्वाचा विषय चालू आहे. पिठासीन अधिकारी म्हणून सांगतो की, मा.आयुक्त यांनी बसून बोलावे.

श्री.रेणुकादास वैद्य :जे बुकलेट दिले. यात घनकचरा व्यवस्थापन, घरोघरी जाऊन ओला सुका कचरा उचलणे तो वेगळा करणे कचऱ्यावर प्रक्रिया करणे, सार्वजनिक शौचालय वैयक्तिक शौचालय, हागणदारी मुक्त करणे, असे दिले स्पर्धा आहे. म्हणून हे करतो आहेत. हे पण योग्य आहे. परंतु कागदावर घेऊन फसवू शकतो. स्वतःला फसवू शकत नाही. नागरीक म्हणून स्वतः फसविण्याचा प्रयत्न करतो असे वाटते. स्वच्छतेत हे शहर एक नंबर यावे सर्वांची भावना आहे. त्यासाठी

उपाययोजना कराव्यात. मा.पालकमंत्री महोदय यांनी जशी मोहिम राबविली होती तशी दररोज मोहिम राबवावी. सामाजिक संस्था व वार्डातील स.सदस्यांना विश्वासात घेऊन काम करावे. कागदपत्रावर नंबर १ वर शहर येऊन फायदा नाही. तर हे शहर प्रामाणिकपणे स्वच्छ करण्यासाठी कार्यप्रणाली अंतिम करावी. हे शहर जास्तीत जास्त स्वच्छ कसे होईल? याची दखल घ्यावी.

श्री.नंदकुमार घोडेले :स्वच्छ महाराष्ट्र अभियान महत्वाचा विषय यासाठी विशेष बैठक आयोजित करावी.

श्री.अब्दुल नाईकवाडी :सिडको कार्यालयाच्या मागे कचऱ्याचे ढिग पडले. कचरा उचलत नाही. हे नुसते कागदावरच असू नये. अंमलबजावणी करावी. अभियान लगेच सुरू करावे. मनातून काम करावे. यात दिले. परंतु त्याप्रमाणे ७० टक्के काम होत नाही.

मा. महापौर :पॉवर पॉईन्ट प्रेझेन्टेशन नुसार माहिती द्यावी.

श्री.राजेंद्र जंजाळ :जे बूकलेट दिले त्यानुसार अंमलात आणतो का ?

(या वेळी मा.आयुक्त यांनी सभागृहात वाटप केलेले बुकलेट नुसार नमुद असलेली माहितीचे पावर पॉइन्ट प्रेझेन्टेशन नुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान संदर्भात सविस्तर माहिती दिली.)

मा.आयुक्त :ओडीएफ वॉर्ड घोषित करावयाचे आहे ५० ठिकाणी लोक उघड्यावर शौचालयास बसतात. ते वॉर्ड आपणांस यातून मुक्त करायचे आहे. हे झाले तर पुर्ण शहर ओडीएफ होणार आहे. सर्वे केला तेंव्हा १११५७ लोक उघड्यावर शौचालयास बसतात. त्याबद्दल माहिती घेतली, तर चार ते पाच हजार लोक खरोखरच असे की, त्यांना शौचालय नाही. ओडीएफ स्पॉटस् कसा करायचे? यासाठी शासनाने जाहीर केलेल्या प्रोटोकॉलनुसार संबंधीत वॉर्डमधील शाळांचे विद्यार्थी, शाळा, शिक्षक व शिक्षकेतर वर्ग, महिला बचत गट, स.नगरसेवक यांचेकडून उघड्यावर कोणी शौचास जात नसल्यासंदर्भात विहीत नमुन्यातील घोषणापत्र प्रमाणित करून घेण्यात येईल. जाहिरात देऊन मुदतीमध्ये जनतेच्या हरकती आक्षेप घेतल्या जातील यासाठी १५ दिवसाची मुदत देणार आहे आणि तसा प्रस्ताव देत आहे.हा भाग झाला प्रोसेसींग सर्व करण्याचा आणि पुर्ण जे १०० टक्के शहर स्वच्छ करायचे त्याचाच दुसरा भाग की जे वैयक्तिक शौचालयासाठी शासन व महापालिकेकडून रू. १२ हजार प्रति लाभार्थी अनुदान मिळाते.आपण ७ हजारचे टारगेट ठेवले आहे की खरोखराच या लोकांना शौचालय नाही.या पैकी २४७६ शौचालय बांधले आहे.जेवढे शौचालय करायचे राहिले ते २६ जानेवारी पर्यत पुर्ण करण्याचा मानस आहे.शताब्दीनगर हर्षनगर फाजलपुरा मिसारवाडी आंबेडकर नगर येथे सार्वजनिक शौचालय करणार आहे सहा ठिकाणी महिलासाठी बीबीका मकबरा, औरंगपूरा, पैठणगेट, सेव्हनहिल, ज्युब्लीपार्क, एन-८ बॉटनिकल गार्डन येथे करण्याचा मानस आहे. त्यासाठी १३५ लक्षची तरतूद कार्यवाही अंतर्गत आहे. पुंडलिकनगर, जवाहर कॉलनी गजानन मंदीर हर्सुल टी पॉईन मध्यवर्ती जकात नाका या ठिकाणी बीओटीवर शौचालय झाले जी टीम येणार ते शाळा, सार्वजनिक शौचालय, बसस्टॅण्ड रेल्वेस्टेशन कमर्शिय जागेमध्ये नारेगाव डंपींग ग्राऊडवर हया सर्व ठिकाणी पाहणार आहे.काही नागरीकांना फोन येऊ शकतो की तुमच्याकडे साफसफाई होते की

नाही. वैयक्तिक शौचालयाचा १४५४ लोकांना दिला आहे. मानस आहे की १०० टक्के शौचालय व स्वच्छता असायला पाहिजे. काही ठिकाणी कर्मचारी कमी असेल तर कर्मचारी दिले जाईल.कचरा लिप्टींगसाठी नवीन प्रपोजल दिले आहे.१०० टक्के कचरा मुक्त शहर करण्याचा प्रयत्न होणार आहे तसेच राज्य शासन प्रोसेसिंग प्लॅन्ट करण्यासाठी मदत करणार आहे यासाठी १० एकर जागा उपलब्ध करून द्यायची आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :शासन स्वच्छ भारत अभियान योजनेवर लाखोचा खर्च करीत आहे. वॉर्ड सलेक्शनचा असेल, खर्च करायचा विषय ते काम होण्यापुर्वी सभेपूढे यावे. परंतु तसे होत नाही. काम झाल्यानंतर विषय येतात. डंपींग ग्राऊंडवर कचरा जाणार नाही याची कार्यवाही होत नाही. ज्या त्या वार्डातील कचरा तेथेच डंपींग होऊन प्रोसेसींग झाला पाहिजे. पुण्याला तशी पध्दत आहे. दोन लेबरच्या सहाय्याने कचरा प्रोसेस होत होतील. खत तयार करून विक्री होते. तशी पध्दत येथे करावी. आताच म्हटले की, रिक्षावर कन्टेंनरवर जीपीएस बसविले जाईल. त्यांने एवढेच कळेल की, गाडी कोठून कोठे लिफ्ट झाली. याने फारसा फरक पडणार नाही. सीसी टीव्ही कॅमेरे प्रत्येक कचरा कुंडीजवळ बसवावे. कचरा उचलला जातो की नाही लगेच कळेल. प्रामाणिक प्रयत्न करावे. शहर स्वच्छ होईल.

मा.आयुक्त :त्यासाठी गुण आहे.

श्री.कैलास गायकवाड :१४५४ नागरीकांना पहिला हफ्त दिला असे म्हटले. आता आरटीएस माध्यमातून काही रक्कम दिली परंतु किती दिली.गुंठेवारी भागातील अनेक नागरीक आजही उघडयावर शौचालयास बसतात ज्यांनी वै.शौचालयास अर्ज केले त्याची कार्यवाही होत नाही. नागरीक आमच्याकडे मागणी करतात. माझ्या वार्डासह मुकूंदवाडीपर्यत रेल्वे स्ट्रॅकच्या साईडला सकाळी अनेक लोक उघडयावर शौचालयास जातात. राजनगर, मुकूंदनगर, आनंदनगर, जयभवानी नगर, विश्रांतीनगर या भागात ड्रेनेजचे काम मंजूर आहे. वर्क ऑर्डर झाली. परंतु मुख्य ड्रेनेजची सिव्हर लाइनचे काम न झाल्यामूळे अंतर्गत लाईन त्यात मिळविता येत नाही. त्यामूळे अनेक लोक आजही उघड्यावर शौचालयास जातात. जेथे ड्रेनेज लाईन टाकायची. तेथे काही ठिकाणी अतिक्रमण आहे. ते काढावे व लाईन टाकाव्यात.

श्री.नंदकुमार घोडेले :कचरा प्रोसेसींगसाठी दहा एकर जागा घेणे आहे. हा विषय चर्चेला आला होता. डीएमआयसीकडे दहा एकर जागेच्या आरक्षणासाठी संबंधीत विभागास पत्रव्यवहार करून कार्यवाहीचे आदेशीत केले होते. करोडी पळशी व शहराच्या बाजूला जागा बघतो. त्यास विरोध होत आहे. शासनाकडे विनंती करून कार्यवाही करावी. स्वच्छतागृह साफ करावे. घरोघरी जाऊन कचरा उचलला पाहिजे. कचरा कुंडी ठेवण्याची वेळ येऊ नये. नवीन रिक्षा आलेल्या आहे. पासींग वगैरे करून वितरीत करावे. सुक्ष्म नियोजन करावे. तसे बुकलेट तयार करून सदस्यांना द्यावे. जे की शहर स्वच्छ करण्यास मदत होईल.

श्रीमती मनीषा मुंडे :माझ्या वार्डात ड्रेनेज लाईन टाकली नाही. एन-३, एन-४ भागातील सर्व ड्रेनेजचे पाणी माझ्या वार्डात येते.

श्रीमती शिल्पाराणी वाडकर:ओपन प्लॉटवर कचरा टाकला जातो. त्या मालकाने किंवा मनपाने तेथे स्वच्छता ठेवली पाहिजे. मिक्स कचरा जमा करू नये. तरच नागरीक ओला व सुका कचरा वेगळा करतील.

श्री मकरंद कुलकर्णी :सिडको भागात अनेक गृह निर्माण संस्था आहे. तेथे स्वच्छता होत नाही. मनपाने स्वच्छता करावी.

श्री.चेतन कांबळे :भिमनगर भावसींगपूरा भागात गुंठेवारी भाग तेथील नागरीकानी वैयक्तिक शौचालयाचे अर्ज केले ते काम होण्यासाठी पैसे मागितले जाते. मनपाचे कर्मचारी यांनी शौचालय बांधले पाहिजे ते सुध्दा शासनाच्या निधीचा लाभ घेतात हे योग्य नाही. मनपाच्या मुख्य इमारतीतच स्वच्छता नाही.

श्रीमती शोभा बुरांडे :नवीन फ्लॅट बांधकामाच्या ठिकाणी, वॉचमन हे उघडयावर शौचालयास जातात त्यांचेसाठी शौचालय असावे.

श्रीमती अर्चना निळकंठ :खड्ड्यांमध्ये कचरा अडकतो, वाळलेले गवत काढले जात नाही. कॅरीबॅग रस्त्यावर पडलेल्या असतात. ओपन प्लॉटवर कचरा टाकला जातो. जे टाकतात त्यांना दंड लावावा. सोसायटीमधील कचरा उचलला पाहिजे.

श्रीमती ज्योती पिंजरकर:मनपाचे ओपन जागा, खाजगी प्लॉटवर तसेच सोसायटीच्या जागावर कचरा टाकला जातो तेथे स्वच्छता असावी. घरोघरी जाऊन कचरा उचलला जावा. कचरा कुंडी मुक्त कराव्यात.

श्रीमती मिना गायके :पुंडलिकनगर भागातील शौचालयासमोर दारुचे दुकान असून लोक दारू पितात, जवळच शौचालयास जातात. नियमीत तेथे घाण असते. महिलाना त्रास होतो. बाजूला जागा आहे तेथे महिलासाठी शौचालय करावे. शिवाजी महाराज पुतळ्याच्या बाजूला सकाळी कचरा उचलला जातो. दुकानदार दहा वाजता येतात. पुन्हा कचरा साचतो. तो वेळीच उचलला गेला पाहिजे. तेथे सीसीटीव्ही कॅमेरा लावावा.

श्रीमती सीमा चक्रनारायण:साफसफाई करून कचरा जमा होतो. तो उचलला जात नाही.

श्री.नासेर सिध्दीकी :सफाई मजूर काम करण्यास सक्षम असतात का? त्याचे आरोग्य तपासणी केले पाहिजे. जे काम करू शकत नाही त्यांना दुसरे काम द्यावे. ज्यांचे ओपनप्लॉट आहे त्यांना ताकीद देऊन तेथे कचरा टाकला जाणार नाही. दखल घ्यावी.

श्रीमती संगिता वाघुले :वैयक्तिक शौचालयाच्या लाभार्थींना ६ हजार दिले. दुसरा टप्पाचे पैसे दिले जात नाही. उर्वरीत बाकी असलेले काम लाभार्थी स्वत:चे पैसे खर्च करून बांधतात. त्यानंतर सर्वे होतो व त्यांना असे सांगितले जाते की, शौचालय बांधले आहे. आता पैसे मिळणार नाही. असे होऊ नये त्यांना पुर्ण लाभ मिळावा.

श्रीमती वैशाली जाधव :चिकलठाणा बाजारच्या ठिकाणी स्वच्छता वेळीच व्हावी.

श्रीमती सुनिता आऊलवार:ओला सुका कचरा साठी घंटा गाडीची व्यवस्था आणखी करावी.

श्रीमती सुरेखा सानप :ब्रिजवाडी येथे दाट वस्ती आहे. ड्रेनेज चोकअप होते. लोक उघडयावर शौचालयास जातात. त्याकरीता जुन्या ड्रेनेज लाईन काढून नवीन लाईन टाकाव्यात. नालीवर ढापे टाकावेत.

श्री.गजानन बारवाल :अनेक ठिकाणी ड्रेनेज लाईन करण्याची गरज आहे. मनपाच्या शाळा आरोग्य केंद्र गार्डन व इतर मिळकती जागा असतील तेथे लोक घान टाकतात अशा जागा स्वच्छ असाव्या. सार्वजनिक शौचालयात स्वच्छता नाही. यादवनगर,

विश्रांतीनगर भागात ओला सुका कचऱ्यातील पोळया गाईला खाण्यास देतात. असे यात दिले गाईला आपण पवित्र मानतो आणि पुस्तकात तसा उल्लेख करणे योग्य नाही. ते यातून वगळावे. शाळा गार्डन असेल शौचालय असेल तेथे सीसीटीव्ही कॅमेरे असावे ते झोन मध्ये लावावे.

श्री.अब्दुल ताहेर शेख :एन-४ भागात दर्पण ग्राऊडवर दारूच्या बाटल्या घाण आणून टाकली जाते. तेथे कचरा कुंडी ठेवावी. कचरा प्रोसेससाठी १० एकर जागा घेणार असे म्हटले, तेथे ४० खड्डे करावे. निसर्ग प्रक्रियेनुसार चाळीस दिवसात कचरा सडतो व त्याचे खत म्हणून उपयोग होईल. वेगळा इतर खर्च करावा लागणार नाही.

श्रीमती समीना शेख :निवडणूक आल्यानंतर माझा वार्ड तीन महिन्याच्या आत कचरा मुक्त झाला. जेथे कचरा पडत होता. तेथे बेंचेस व इतर सुविधा केल्या. हे प्रत्येक वार्डात व्हावे. कर्मचारी यांची कामाची वेळ निश्चित करावी. ११-३० वाजेच्या अगोदर कर्मचारी साईटवर नसतात.

श्रीमती माधुरी देशमुख :बुकलेट मध्ये टोल फ्रि नंबर दिला. तो बंद आहे. हे काम कागदोपत्रीच होऊ नये. सभागृह सहमत नाही. यात स्वच्छता ॲप म्हणून दिले. यात अनेकांना या बाबत माहिती नाही. जनजागृती करणे आवश्यक आहे. स्वच्छता ॲपपेक्षा कर्मचारी यांनी चांगले काम केले. तर हया समस्या येणार नाही. दररोज कचरा गोळा होत नाही. शनिवारी कचरा उचलला नाही. तर रविवारी कर्मचारी नसतात. सोमवारी मोठा कचरा जमा होऊन लोकांना साठवून ठेवावा लागतो. माझ्या वार्डात धरम पॅलेस समोर पाण्याच्या लाईनचा वॉल आहे. तो ब्रीजच्या खाली आला. तेथे लोक लघवीसाठी जातात. घाण पाणी लोकांना पिण्यासाठी जात असेल तर योग्य नाही. तो वॉल तेथून काढावा. स्वच्छता अभियान राबवितो. तर आरोग्यही चांगले ठेवणे आवश्यक आहे. रस्ता स्वच्छ करण्याची गाडी मिळत नाही. पाणी कचरा इतर प्रश्न असेल सर्व वार्डातील हे प्रश्न सुटण्यासाठी प्रयत्न करावे. मराठवाडा साहित्य परीषद यशवंतराव चव्हाण सभागृहाच्या बाजूला नियमीत कचरा पडलेला दिसतो. एमजीएमच्या बाजूला एन-५ च्या दुभाजकावर ॲपेक्स हॉस्पीटलच्या समोर कचरा दिसतो. नाल्याच्या ठिकाणी कचरा पडलेला असतो. स्वच्छ भारत अभियान हे कागदावर न राबविता प्रत्यक्ष राबविल्या जावे.

श्री.जहागीर खान :प्रत्येक दिवशी वार्डातील सफाई कर्मचारी २-३ गैरहजर असतात. काही कर्मचारी यांचे जागेवर दुसरेच काम करतात जाधववाडी भाजी मंडई येथील कचरा साफसफाई करावा.

श्री.सुभाष शेजवळ :१९९४ पासून शहरात जागोजागी शौचालय बांधले. त्याची दयनीय अवस्था आहे. नवीन शौचालय करणार असेल तर कर्मचारी पाण्याची सुविधा देणार आहे का? माझ्या वार्डात पाच शौचालय बांधलेले होते. आज वाईट परीस्थिती आहे. वैयक्तिक शौचालयासाठी १२ हजार देतो. शासनाचा आलेला निधी पुर्ण खर्च होतो का? माझ्या वार्डात हायवे रोडवर शौचालय करावे. पर्यटन स्थळाच्या ठिकाणी शौचालय करावे.

श्रीमती मनीषा लोखंडे :माझ्या वार्डात जुनी ड्रेनेज लाईन नेहमी चोकअप होते त्या बदलाव्यात.

श्रीमती स्वाती नागरे :माझ्या वार्डात भाजी मंडई च्या ठिकाणी सुलभ शौचालय बांधण्यात यावे.

श्रीमती किर्ती शिंदे :जिल्हा परीषद मैदानवर कचरा टाकला जातो. तो वेळीच उचलला जात नाही. तसेच अंतर्गत ड्रेनेज लाईनचे काम व्हावे.

श्री.रामेश्वर भादवे :गजानन महाराज मंदीर ते शिवाजी महाराज पुतळा पुंडलिकनगर रस्त्याचे काम थांबलेले आहे. सायंकाळी मोठी वाहतूक असते. धुळीमूळे लोकांना त्रास होत आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :या रस्त्याचे काम होणार आहे. २ तारखेला कामाचे भुमीपुजन होणार आहे.

श्रीमती कमल नरोटे :घंटागाडी देण्यात याव्यात कर्मचारी कमी आहे रिक्षाची संख्या वाढवावी.

श्रीमती पुष्पा रोजतकर :माझ्या कॅबीनच्या बाजूला शौचालयात मोठी घाण झाली आहे. स्वच्छता केली जात नाही.

श्री.अब्दुल नाईकवाडी :विद्युत डीपी जवळील कचरा उचलला जात नाही. एमएसईबी कडून सफाई कर वसुल करावा. जळगाव रोड ते सेन्ट्रल नाका रस्त्याच्या बाजूला बारीक माती पडलेली आहे. काम पुर्ण झाले नाही. संबंधीतास बील देऊ नये. रस्त्याच्या कडेला कचरा पडलेला दिसतो. ओपन स्पेसच्या जागेवर कचरा टाकतात. तेथे कॅमेरा लावून जे कचरा टाकतात. त्यांचेवर कार्यवाही करावी. गार्डन मध्ये दारूच्या बॉटल आढळून येतात. बाजूला नाला आहे. तेथे माती आहे. ड्रेनेजचे पाणी वाहते. फोन केला असता, कुणीही येत नाही. तसेच प्रत्येक वार्डात किती सफाई कर्मचारी आहे. काम किती करतात. त्याची सदस्यांना माहिती दिली पाहिजे. लेबर घेण्याबाबत अद्याप टेंडर झाले नाही. जुन्याच एजन्सीला मुदतवाढ दिली जाते.

श्रीमती खान सायरा बानो:सर्वांना बोलण्याची संधी द्यावी सार्वजनिक शौचालय जे मंजूर झाले ते अगोदर करावे. शहागंज भाजी मंडईतील जुने शौचालय तोडले. ते नव्याने पुर्ण काम करावे.

श्रीमती शोभा वळसे :माझ्या वार्डात जुनी ड्रेनेज लाईन चोकअप होते. ती बदलावी.

श्रीमती समीना शेख :कालच्या पेपरला आले की धार्मीक स्थळे वाचविण्यासाठी हालचाली सुरू,

श्री.राजेंद्र जंजाळ :विषयांतर होऊ नये. स्वच्छ महाराष्ट्र अभियान संदर्भात विषय चालू आहे.

श्रीमती समीना शेख :१९७२ चा डीपी प्लॅन आहे तो बदल करता येतो का ? राजकीय पक्षाच्या दबावामुळे हे होते काय ?

मा.महापौर :स्वच्छ महाराष्ट्र अभियान विषय चालू आहे त्यावर बोलावे. नंतर चर्चा केली जाईल.

यावेळी अनेक स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात.

श्री.नंदकुमार घोडेले :सन २०१०-११ मध्ये स्वच्छता दुत म्हणुन सिने अभिनेता श्री.मकरंद अनासपुरे यांची नियुक्ती केली होती.परत ते काम करीत असतील तर नियुक्ती करावी.

श्री.सचिन खैरे :माझा वार्ड मोठा आहे सफाई लेबर वाढवून द्यावे स्मशानभुमी जवळ कचरा डम्पींग केला जातो. तो वेळेवर उचलत नाही. त्याची दखल घ्यावी. पर्यटन ठिकाणी कचरा उचण्यात यावा.

श्री.राजेंद्र जंजाळ :शहर टॉपटेन मध्ये यावे. प्रयत्न चालू आहे. सभागृहाच्या वतीने प्रशासनाला शुभेच्छा देतो. दुभाजन स्वच्छतेसाठी कर्मचारी दिले असे म्हटले. टॅक्स विभागातील बदली झालेले कर्मचारी साफसफाई साठी दिले परंतु ते कर्मचारी आजही टॅक्स मध्येच काम करतात. प्रत्येक वार्डात मजूर कर्मचारी कमी आहे.

सफाई कर्मचारी काहींना जवान तर काहींना एसआय केले. त्यामूळे स्वच्छतेचे कर्मचारी कमी झाले. भरती केली नाही. जे सफाई कामगार असेल त्यांना तेच काम द्यावे. बायोमेडिकल वेस्टचा उल्लेख यात नाही. सर्वच कुंडीत दवाखान्याचा कचरा त्यात इन्जेक्शन, बॉटल असतात. त्यामूळे अपघात होऊ शकतो. नारेगाव येथे ई-वेस्ट कचरा जे बॅटरी वगैरे टाकली होतीञ एक मुलगी तेथे कचरा वेचण्यासाठी गेली स्फोट होऊन तीचा मृत्यू झाला. हा गंभीर विषय आहे. दुरगामी परीणाम शहरावर होणार आहे. मा.पालकमंत्री महोदय यांनी अभियान घेतले. ४५० टन कचरा जमा केला होता. त्याप्रमाणे सफाई होणे आवश्यक होते. शहरात अनेक ठिकाणी बांधकामाचे माती, सिमेंट रस्त्यावर पडलेले दिसून येते प्लास्टीक ई-वेस्ट, ओला-सुका कचरा वर्गीकरण करणे आवश्यक होते काही ठिकाणी कचरा मुक्त वार्ड केले. परंतु जेथे कचरा टाकत होते. त्या ऐवजी लोकांनी दुसरीकडे कचरा टाकण्यास सुरूवात केली. कचरा कुंडी मुक्त करण्यासाठी घरोघरी जाऊन कचरा जमा करणे आवश्यक आहे. वैयक्तिक शौचालयासाठी लाभार्थींना १२०००/- रुपये देतो. परंतु ड्रेनेज लाईन नाही. लाभार्थींना सेफ्टी टँक बाधावा लागतो. सातारा परीसरात उघडयावर ड्रेनेजचे पाणी सोडलेले दिसून येते.स्वच्छ महाराष्ट्र अभियान राबविण्यासाठी योग्य नियोजन करावे सुचना केल्या त्याचे पालन करावे वाढीव कर्मचारी द्यावे त्यांना ओळखपत्र असावे. कर्मचाऱ्याची वेळ निश्चित असावी. कोणत्या वार्डात किती कर्मचारी त्याची कामाची वेळ कोणती? सर्व माहिती त्या वार्डाचे सदस्यांना द्यावी.

श्री.नासेर सिद्दीकी :बांधकाम केलेले साहित्य रस्त्यावर पडलेले असते. कचरा अडकतो .त्यामूळे अनेक ठिकाणी कॅरीबॅग व इतर कचरा रस्त्यावर दिसून येतो.

श्रीमती रेशमा कुरैशी :माझ्या वार्डात कचरा उचलला जात नाही. वाढीव कर्मचारी द्यावे. भाग्यनगर भागात कचरा कुंडी देण्यात यावी.

श्री.जफर शेख :वार्डात पाच फुटाच्या गल्ल्या आहे. ८-८ फुट कचऱ्याचे ढिग पडलेले असतात. गल्ली नंबर-८ मध्ये नुरगेटच्या बाजूला मोठा कचरा पडलेला असतो. कचरा गाडी छोट्या गल्ल्यांमध्ये जात नाही. कारण नागरीकांनी दोन्ही बाजूने ओटे केलेले आहे. ते हटविण्यात यावे.

श्री.बन्सी जाधव :वार्डात ड्रेनेज लाईनचे काम करावे. बोअरला घाण पाणी येते. तेच पाणी नागरीक पितात.

श्री.अजीम अहेमद :कटकट गेट जवळील कचरा कुंडी काढावी. साफसफाई साठी वाढीव कर्मचारी द्यावे.

श्री.अब्दुल मं.नाविद :काही वार्डात स्वच्छता होते. तर स्लम, दलित वस्ती भागात स्वच्छता होत नाही. वार्डात ११ लेबर दिले सांगतात. ते कर्मचारी नियमित गैरहजर असतात.

श्री.राजगौरव वानखेडे :ओला-सुका कचरा वेगळा करण्यासाठी स्वेच्छानिधीतून डस्टबीन घेण्यास परवानगी द्यावी. डम्पींग पॉईन्टवर सीसीटीव्ही कॅमेरे लावावे.

श्री.त्र्यंबक तुपे :जुने शौचालयची दुरूस्ती करून ते चालू करावे. असे किती शौचालय आहे. तेथे साफसफाई होते का? अनेक ठिकाणी बांधकाम होते मटेरीयल रस्त्यात टाकले जाते. त्यात कचरा अडकतो. बीआयला तशी ताकीद द्यावी. नाल्यातील

कचरा उलललला जावा. साफसफाईसाठी आवश्यकतेनुसार कर्मचारी द्यावे. त्यांचे आरोग्य तपासणी व्हावी. आठ दिवसात कॅम्प घ्यावा. गुंठेवारी, स्लम भाग असेल तेथे ड्रेनेज लाईन नाही. त्या कराव्यात जे की, वैयक्तिक शौचालयाची लाइन त्यात मिळविली जाइल वैयक्तिक शौचालयासाठी १२ हजार दिले जाते. त्यात काम पुर्ण होत नाही किमान २५-३० हजार रक्कम लाभार्थींना मिळाली पाहिजे.शासनाकडून निधी मागवावा.

श्री.गजानन मनगटे :स.सदस्यांच्या सुचना विचारात घेऊन योग्य ती कार्यवाही करावी. हा विषय मंजूर करावा.

श्री.जमीर कादरी :माझ्या वार्डात खामनदी तेथे ड्रेनेज लाईनचे काम चालू आहे पुर्ण घान पाणी साचलेले आहे. मटेरीयल अस्थावेस्त पडलेले दिसून येते. त्यात कचरा अडकतो. जेसीबी येथे १० मिनिट काम होते. वैयक्तिक शौचालयाचा सर्वे माझ्या वार्डात केला परंतु काम होत नाही. वार्डातील सफाई कामगार कमी आहे. ते वाढवावे तरच स्वच्छ शहर होऊ शकते.

मा.आयुक्त :काही वार्डात लेबर कमी आहे. ड्रेनेजची समस्या शहरात आहे. युआयडीएसएसएमटी अंतर्गत मुख्य ड्रेनेज लाईन करण्यावर भर दिला. काही हुडकोकडून कर्ज मिळणार होते. तसेच केंद्र शासनाकडून दुसरा हप्त्यापोटी १२७ कोटी यायचे आहे. तो निधी आल्यानंतर ज्या ज्या ठिकाणी ड्रेनेज लाईनची स्लम भाग, रेल्वे पटरीच्या भागातील ड्रेनज लाईनचा प्रश्न होता. त्या सर्व लाईन कनेक्टींग करून मुख्य लाईनला कसे मिळविता येतील. कार्यवाही करू. वैयक्तिक शौचालयाचे अर्ज ज्यांनी दिले नाही. ते अजुनही सहभाग घेऊ शकतात. जे वार्ड अधिकारी असे अर्ज घेणार नाही. त्याचेवर कार्यवाही करू. या लाभार्थींना दुसरा हप्ता दिला जाईल. आताच सुचना केल्यानुसार मुख्य ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरा बसविले जातील. लिप्टरची संख्या कमी आहे. ती वाढविली जाईल. कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी केली जाईल. कर्मचारी यांचे जागेवर त्यांचा मुलगा, सुन किंवा मुलगी काम करीत असेल तर ॲक्शन घेत नाही. परंतु या व्यतिरिक्त दुसरे व्यक्ती काम करीत असेल तर ॲक्शन घेतली जाईल. ओपन प्लॉटवर कचरा टाकला जाऊ नये दखल घेऊ, नारेगांव येथील शाळेचा प्रश्न होता. प्रत्येक शाळेत स्वच्छतेसाठी एक लेबर ठेवणार आहे. टोल-फ्रि क्रमांक चालू केला जाईल. शनिवार, रविवार व फेस्टीवलच्या वेळी जास्त कचरा साचतो. त्यासाठी वेगळे प्लॅनिंग होईल. एमजीएम येथील महिला शौचालया बाबत कार्यवाही होईल. प्रत्येक कर्मचारी यांनी वैयक्तिक शौचालय करायचे आहे. एमजीएम असेल इतर ठिकाणी दुभाजकातील कचरा उचलण्यासाठी ३० कर्मचारी दिले. बदल्या केलेले कर्मचारी पुन्हा टॅक्स विभागातच काम करतात का चौकशी केली जाईल. पुर्णपणे स्वच्छता आहे. असा दावा प्रशासन करीत नाही. परंतु समस्या मोठया प्रमाणात आहे. या प्रक्रियेमध्ये सर्वांचा सहभाग अपेक्षीत सर्वांनी मिळून काम करावे लागणार, पर्यटन ठिकाणी स्वच्छता केली जाईल. मनपा फंडातुन १८ सार्वजनिक शौचालय बांधले. जेथे स्वच्छता नसेल ती केली जाईल. पाण्याची व्यवस्था होईल. यासाठी या वर्षी १.३५ कोटीची तरतूद होती. पुढील वर्षी आणखी तरतूद वाढवून ज्या ठिकाणी आवश्यकता

आहे. तेथे सार्वजनिक शौचालय होईल. वार्ड क्र.२९ मध्ये स्वच्छतेचा विषय होता माहिती घेतली जाईल. ई-वेस्ट प्लॉस्टीक कचरा, तसेच घरोघरी जाऊन कचरा जमा केल्यास शहर १०० टक्के स्वच्छ होईल कर्मचारी यांना ओळखपत्र दिले जाईल. कर्मचारी यांची एक महिन्याच्या आत आरोग्य तपासणी केली जाईल. दलित वस्ती व स्लम भागात चांगल्या प्रकारे साफसफाई होते. वैयक्तिक शौचालयासाठी १२ हजार अनुदान हा निधी कमी पडत असेल, त्यासाठी सर्वसाधारण सभेने आणखी वाढीव ५-६ हजार निधी देऊन त्या प्रमाणे टारगेट करता येईल. डीएमआयसी भागात १० एकर जागेचा विषय त्या बाबत नगरविकास विभागचे मा.सचिव यांचेशी चर्चा झाली. त्यांचे म्हणणे की, त्या ठिकाणी डंम्पींग प्रोसेसिंग ग्राऊंड केले तर औद्योगिक क्षेत्रास प्रमोट करण्यासाठी जी पॉलीसी आहे, ती होणार नाही व बाकीच्या कंपन्या तेथे येणार नाही. स.सदस्य श्री.शिवाजी दांडगे, श्री.विजय औताडे यांचे वार्डात चांगल्या प्रकारे साफसफाई होते. स.सदस्यांनी या कामात पुढाकार घेतलेला आहे. अशा प्रकारे इतर वार्डात साफसफाई करण्याचा मानस असणार आहे. डस्टबीन बाबत टेंडर करू रेट अंतिम करून कार्यवाही केली जाईल.

मा.महापौर :मा.पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी यांनी तीन वर्षात पुर्ण भारत स्वच्छ करण्याचे स्वप्न ठरविले आहे. सर्व सदस्यांना विश्वासात घेतल्यानंतर त्यांचे सुचना किती आल्या? काय त्रुटी आहे? याची जाणीव प्रशासनाला झाली असेल. स्मार्ट सिटी कडे वाटचाल करीत असतांना आता ५६ वा क्रमांक आहे. जर टॉप टेन मध्ये जायचे असेल तर सदस्यांनी ज्या सुचना केल्या त्या विचारात घेऊन प्रशासन व सभागृहाने आपण सर्व मिळून काम केले तर निश्चित यश प्राप्त होईल. वैयक्तिक शौचालयासाठी कुणी पैसे मागत असेल तर चौकशी करावी. वैयक्तिक शौचालयाचे काही अर्ज धुळखात पडून आहे. ही बाब गंभीर आहे. ६१ वार्ड मध्ये सुका व ओला कचरा मोहिम चालू केली. ती मोहिम सर्व वार्डात झाली पाहिजे. हे शहर स्वच्छ व सुंदर करण्यासाठी स.सदस्यांना सोबत घेऊन काम करावे. सदस्यांना वेळोवेळी विश्वासात घेऊन काम करावे. स्वच्छतेच्या बाबतीत प्रत्येक आठवड्यात बैठक घेऊन प्रशासनाने कार्यवाही करावी. शहर स्वच्छ व सुंदर झाले पाहिजे. हीच सर्वांची भावना आहे. हा प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक स्वमअ-२०१५/ प्र.क्र.२४९/नवि-३४,दिनांक १९.११.२०१५ नुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यास व सादर केलेल्या अहवालास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही

**विषय क्रमांक ८१६:-** **(उपआयुक्त, प्रशासन)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्राथमिक शाळा शताब्दीनगर या शाळेत इयत्ता ३ री मध्ये शिकत असलेली कु.राणी रंगनाथ डोईफोडे ही विद्यार्थीनी तिच्या आईसोबत पाणी भरण्यासाठी जात असतांना दिनांक २२.०९.२०१६ रोजी एका भरधाव वाहनाच्या धडकेने ती व तिची आई गंभीर जखमी झाले होती. त्यानंतर घाटीमध्ये उपचार चालू असतांना राणी रंगनाथ डोईफोडे या विद्यार्थीनीचे दिनांक

२३.०९.२०१६ सकाळी पहाटे ४.०० वाजता निधन झाले असल्याचे मुख्याध्यापिका प्राथमिक शाळा शताब्दीनगर यांनी कळविले आहे.

तथापि, श्रीमती रंजना रंगनाथ डोईफोडे यांनी दिनांक २६.०९.२०१६ रोजी अर्ज करून त्यांची मुलगी कु.राणी रंगनाथ डोईफोडे ही दिनांक २२.०९.२०१६ रोजी मयत झाली असून त्यांची परिस्थिती अत्यंत हालाखीची असून राहण्यासाठी घर नाही. तरी महानगरपालिकेकडून आर्थिक मदत मिळावी अशी विनंती केली आहे.

करीता, कु.राणी रंगनाथ डोईफोडे या मयत झालेल्या विद्यार्थीनीच्या आईची परिस्थिती अत्यंत हालाखीची असल्याने व त्या महानगरपालिकेच्या शाळेत शिकत असल्यामुळे त्यांना महानगरपालिकेतर्फे रुपये ५०,०००/-(अक्षरी पन्नास हजार रुपये) आर्थीक सहाय्य मिळावे यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्राथमिक शाळा शताब्दीनगर या शाळेत इयत्ता ३ री मध्ये शिकत असलेली कु.राणी रंगनाथ डोईफोडे या मयत झालेल्या विद्यार्थीनीच्या आईस महानगरपालिकेतर्फे रुपये ५०,०००/-(अक्षरी पन्नास हजार रुपये) आर्थीक मदत देण्याकरीता नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ८१७:-</u>** **<u>(कार्यकारी अभियंता, वॉर्ड क्र.१,२,३ व ८)</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरातील टी.व्ही.सेंटर,हर्सुल व पडेगाव येथे अग्निशमन केंद्रासाठी इमारत बांधणे करीता खालीलप्रमाणे अंदाजपत्रके तयार करण्यात आली आहेत.

१. टी.व्ही.सेंटर येथे अग्निशमन केंद्रासाठी इमारत बांधणे. र.रु.९४,१६,०००/-
२. पडेगाव येथे अग्निशमन केंद्रासाठी इमारत बांधणे. र.रु.९४,१६,०००/-
३. हर्सुल येथे अग्निशमन केंद्रासाठी इमारत बांधणे. र.रु.९४,१६,०००/-

---------------------------

एकुण र.रु.२,८२,४८,०००/-

---------------------------

वरील तीनही ठिकाणापैकी हर्सुल येथे अग्निशमन केंद्राची इमारत बांधण्यासाठी जागा उपलब्ध नसल्याने त्याऐवजी रोजाबाग येथील सेटलींग टँक येथे अग्निशमन केंद्रासाठी इमारत बांधण्याचे प्रस्तावित आहे.

सदरील इमारतीत तीन फायर गाड्यांची व्यवस्था करणे, ५०,०००/- लिटर क्षमतेचा Sump पाणी साठविण्यासाठी तयार करणे, कन्ट्रोल रुम, स्टोअर रुम, ऑफीस रुम बांधणे इ.बाबींचा समावेश आहे.

सदरील कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन-२०१५-१६ च्या दरसुचीनूसार वरील दर्शविल्याप्रमाणे एकत्रित रक्कम रुपये २,८२,४८,०००/- चे तयार करण्यात आले आहे.सदरील कामाचा खर्च सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात “विभागीय आपत्कालीन व्यवस्थापन” या लेखाशिर्ष अंतर्गत असलेल्या तरतुदीमधून प्रस्तावित आहे.

तरी वरीलप्रमाणे तीन ठिकाणी अग्निशमन केंद्राची इमारत बांधण्यासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रुपये २,८२,४८,०००/- चे अंदाजपत्रक मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

श्री.त्र्यंबक तुपे :यामध्ये टी व्ही सेन्टर व हर्सुल येथे केंद्र करणार असे दिले. यामध्ये अंतर किती मनपाचे अनेक ठिकाणी अग्निशमन केंद्र आहे. तेथे कर्मचारी काम

करतात. या कर्मचाऱ्याना या ठिकाणी मनोरजंन म्हणून खेळासाठी जागा असायला पाहिजे. स्पोर्ट ॲक्टिव्हिटी करता येतील. याचा विचार करावा.या केंद्रासाठी एकूण जागा किती आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :हर्सुल येथे केंद्रासाठी जागा उपलब्ध नाही तर अंदाजपत्रक करण्याची गरज नव्हती असे वाटते. हे तीन केंद्र करण्यास हरकत नाही.गारखेडा परीसर मोठा व दाट लोकवस्तीचा भाग आहे. येथे अग्निशमन केंद्र करावे त्यासाठी नाथप्रांगन, कारगीर वन ची जागा आहे. गारखेडा परीसरात एक अग्निशमन केंद्र प्रस्तावित करावे. सातारा-देवळाई भागातही एक केंद्र असावे. यास प्राधान्याने करावे.

श्री.सिताराम सुरे :डी-मार्टच्या बाजूला १.१७ एकर जागा रस्त्यावर आहे. यात रोजाबाग येथील सेटलीग टॅंक येथे केंद्र करणार असे म्हटले. ही जागा कोणती आहे. टी.व्ही. सेन्टर, हर्सुलच्या सेंन्टरवर हे केंद्र होईल. एक केंद्र करण्याची गरज पडणार नाही. किमान एक कोटीचा फायदा होईल. डी-मार्टच्या बाजुला एक जागा निश्चीत करण्यास सांगितले होते. त्या बाबत काय कार्यवाही केली.

श्री.नासेर सिद्दीकी :टी व्ही सेंन्टर व रोजाबाग हे दोन्ही ठिकाणचे अंतर जवळ होत आहे. त्यामूळे यापैकी एका ठिकाणी केंद्र करावे दुसरे केंद्र जेथे जागा उपलब्ध आहे अशा ठिकाणी जे शहांगज भागात करण्यात यावे.

श्री.नंदकुमार घोडेले :शहराची वाढती लोकसंख्या व गरज लक्षात घेता ५ ठिकाणी केंद्र करण्याचा डीपीआर करून शासनास पाठविलेला होता त्याचा निधी सुध्दा आला होता. त्यांचा निधी इतर ठिकाणी खर्च केला.त्यातील पैठणरोड भागात एक अग्निशमन केंद्र प्रस्तावित होते जागा आरक्षीत केली होती ते केंद्र यातून का वगळण्यात आले.वाढता परीसर लक्षात घेता कांचनवाडी भागात अग्निशमन केंद्र प्रस्तावित करावे.

श्रीमती सायरा बानो :यासाठी जुना निधी वापरात आणणार की नवीन मागविणार आहे. जर अगोदरचा निधी वापरणार असाल तर यापुर्वी शासनाने २०१२ साली पाच केंद्रास मंजूरी दिली. त्यात शहागंज येथे अग्निशमन केंद्राचा उल्लेख होता. हा भाग जुना आहे. येथे केंद्र करण्यास प्राधान्य द्यावे. येथे निवासी कमर्शियल सर्व भाग येतो. आता प्रस्तावात दिल्याप्रमाणे टीव्ही सेन्टर ते रोजाबाग यात दीड कि.मी.चे अंतर आहे. तेथे दोन केंद्राची गरज नाही. नव्याने प्रस्ताव देत असताना मॅन पावर आहे का? नवीन गाड्या खरेदी करणार काय या केंद्रासाठी किती जागा उपलब्ध आहे? या अगोदरचे अग्निशमन केंद्र जी मंजूरी मिळाली त्यास प्राधान्य द्यावे त्यानंतर हे करावे.

श्री.नंदकुमार घोडेले :आरक्षीत असलेल्या व मनपाने ताब्यात घेतलेल्या अशा अग्निशमन केंद्रासाठी किती जागा आहे? जेथे जागा आहे तेथे प्रस्तावित न करता जेथे जागा नाही तेथे करण्याचे प्रस्तावित केले.

श्री.अब्दुल नाईकवाडी :शहागंज भागात जागा आहे व तेथे केंद्र करणे आवश्यक आहे. या भागात आग लागल्यास गाड्या येण्यास वेळ लागतो या भागात तातडीने केंद्र करावे.

सहा.संचालक (न.र) :पैठण रोड ला फायर साठी जागा आरक्षीत नाही. परंतु त्या परिसरात मनपाची तेथे फायरसाठी जागा आहे.

मा.आयुक्त :नगर विकास विभागामार्फत सन-२००९ मध्ये पाच ठिकाणी अग्निशमन केंद्र बांधणे व सात वाहने खरेदी करणे बाबत निधी आलेला होता. त्यात ३५ टक्के शासनाचा हिस्सा मनपाचा ६५ टक्के खर्च करायचा होता. शासनाचा १.७८ मनपाचे ३.३१ कोटी खर्च करायचे होते. तो निधी इतर कामासाठी वळती झालेला आहे. त्याची चौकशी चालू आहे. काही निधी हा विशिष्ट कामासाठीच असतो. पडेगाव, सिडको, विटखेडा, शहांगज, हर्सुल येथे प्राधान्याने केंद्र करायचे होते. यापुर्वी दोन ठिकाणी आग लागली तेथे गाडी सुध्दा जात नाही. असे दिसून आले. तसेच बीड, जालना या जिल्ह्याचा समावेश मनपाकडे आहे. हाय-वे रोडवर केंद्र असायला पाहिजे. पडेगाव येथील जागेसाठी कार्यवाही करावी लागेल. ज्या ठिकाणी जागा आहे तेथे केंद्र प्राधान्याने करण्याचे निश्चित केले आहे. शहागंज येथे केंद्र करण्यासाठी मान्यता झाली आहे. जी सुचना मांडली स्पोर्ट ॲक्टीव्हिटीज साठी व्यवस्था करण्या बाबत विचार करता येईल.

श्री.नासेर सिद्दीकी :टीव्ही सेन्टर व रोजाबाग चे अंतर कमी आहे. सेन्टर पॉईन्ट बघून एकाच ठिकाणी व्हावे.

श्री.त्र्यंबक तुपे :डि-मार्टच्या बाजूला जागा आहे. तेथे एक केंद्र केल्यास सेंन्टरवर येते. विचार करावा. सातारा देवळाई येथे केंद्र करावे. कर्मचारी फिटनेससाठी या ठिकाणी स्पोर्ट ॲक्टीव्हिटीज असाव्यात. त्यासाठी नियोजन करावे.

श्री.राजगौरव वानखेडे :सेटलींग टँक म्हणून दोन जागा आहे नेमकी कोणती जागा घेणार आहे? डी मार्टच्या बाजूलाही सिडकोची जागा आहे. तेथे केंद्र केले तर टी व्ही सेन्टर येथे केंद्र करण्याची गरज पडणार नाही.

श्री.त्र्यंबक तुपे :डी मार्ट च्या बाजूला मोक्याची जागा आहे. दुसऱ्याला ती जागा न देता तेथे केंद्र करण्याचा विचार करावा.

मा.आयुक्त :जी सेन्टरवर येईल व मोठी जागा आहे ती घेतली जाईल.

श्री.नंदकुमार घोडेले :पुर्वीच्या पाच केंद्रामध्ये विटखेड्याचा समावेश होता. सातारा देवळाई मनपाकडे आले. पैठण रोड ते बीडबाय पास या मध्ये एक केंद्र प्रस्तावित केले. तरी चालेल.

मा.महापौर :स.सदस्यांच्या सुचना विचारात घेऊन सातारा-देवळाई, गारखेडा, हा परीसर मोठा होत आहे. शहागंज हा भाग सुध्दा दाट वस्ती आहे. या ठिकाणीही केंद्र असावे. स्पोर्टचे कॉम्प्लेक्स जे की कर्मचारी यांना खेळासाठी सोई-सुविधा असायला पाहिजे. दुरूस्तीसह हा प्रस्ताव मंजूर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहरातील टी.व्ही.सेंटर, हर्सुल ऐवजी रोजाबाग येथील सेटलींग टँक येथे व पडेगाव येथे अग्निशमन केंद्रासाठी इमारत बांधणे करीता तसेच सदरील इमारतीत तीन फायर गाड्यांची व्यवस्था करणे, ५०,०००/- लिटर क्षमतेचा Sump पाणी साठविण्यासाठी तयार करणे, कन्ट्रोल रुम, स्टोअर रुम, ऑफीस रुम बांधणे इत्यादी कामासाठी तयार करण्यात आलेल्या "विभागीय आपत्कालीन व्यवस्थापन" या लेखाशिर्ष अंतर्गत एकत्रित रक्कम रुपये २,८२,४८,०००/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. तसेच सदर अग्निशमन केंद्र असलेल्या ठिकाणी कर्मचारी यांना स्पोर्ट ॲक्टीव्हिटीज् देण्यास व स.सदस्य यांनी केलेल्या सुचनेनुसार त्या त्या भागात जागेची उपलब्धता विचारात घेऊन नियमानुसार अग्निशमन केंद्र करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ८१८:-** **(कार्यकारी अभियंता, वॉर्ड क्र.१,२,३ व ८)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, आरेफ कॉलनी येथील हिमायत बाग लगतच्या १८ मीटर रुंद विकास योजना रस्त्याचे कॉंक्रीटींग करणे या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २०१५-१६ च्या दरसुचीनूसार रक्कम रूपये ६०,८५,८०७/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील कामाचा खर्च सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पातील विकास योजनेअंतर्गत रस्ते मजबुतीकरण करणे व नवीन डांबरी रस्ते लेखाशिर्ष अंतर्गत उपलब्ध असलेल्या तरतुदीमधून करण्यात येईल.

तरी या कामाकरीता तयार करण्यात आलेले रक्कम रुपये ६०,८५,८०७/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, आरेफ कॉलनी येथील हिमायत बाग लगतच्या १८ मीटर रुंद विकास योजना रस्त्याचे कॉंक्रीटींग करणेच्या कामाचे रक्कम रूपये ६०,८५,८०७/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ८१९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शहरामध्ये ठिकठिकाणी मुस्लीम कब्रस्तान आहे. परंतु तेथे सुरक्षा रक्षक नसल्यामुळे फिरते जनावरे कब्रस्तान मध्ये शिरत आहे. त्यामुळे येथील कब्रास्थानातील कब्री उकरत आहे. त्याठिकाणी कधीही कोणतेही कृत्य घडू शकते. त्यामुळे धार्मिक दृष्टीने येथील मुस्लीम लोकांना फार त्रास होत आहे. करिता काही कब्रस्तांनामध्ये संरक्षीत भिंत सुध्दा नाही व सुरक्षा रक्षक नसल्यामुळे वरील प्रमाणे सर्व घडत आहे.

करीता मा.सर्वसाधारण सभेत मुस्लीम कब्रस्थानामध्ये सुरक्षा रक्षक देणे करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख **अनुमोदक:-** श्री.एडके विकास प्रकाश

श्री.मकरंद कुलकर्णी :स्व.बाळासाहेब ठाकरे बॉटनिकल गार्डन येथे सुरक्षा रक्षक द्यावे.

श्रीमती समीना शेख :यापुर्वी मुस्लीम कब्रस्तान मध्ये सुरक्षा रक्षक देणे बाबत ठराव मंजूर केला होता. अंमलबजावणी का केली नाही? काही सुरक्षा रक्षक यांनी उपोषण केले. त्यांना मानधनावर अद्याप घेतले नाही. आता किती दिवसात कार्यवाही होईल?

श्री.अब्दुल नाईकवाडी :यापुर्वी ठराव केला होता कार्यवाही का होत नाही?

श्री.रामेश्वर भादवे :हा ठराव मंजूर करावा.

मा.महापौर :स्मशानभुमी, कब्रस्तान, बॉटनिकल गार्डन असेल इतर महत्वाच्या ठिकाणी प्राधान्याने सुरक्षा रक्षक देणे बाबत कार्यवाही करावी.

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर. कब्रस्तान, स्मशानभुमी असेल हे महत्वाचे मनपाचे ठिकाणे आहेत. अशा ठिकाणी सुरक्षा रक्षक द्यावे. प्राधान्याने हे काम ताबडतोब नियमानुसार करावे.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहरामध्ये ठिकठिकाणी असलेल्या मुस्लीम कब्रस्तान, स्मशानभुमी तसेच स्व.बाळासाहेब ठाकरे बोटॅनिकल गार्डन येथे नियमानुसार सुरक्षा रक्षक देण्याची कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ८२०:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.११४, माऊलीनगर येथून नारायणा वंडर्स स्कुल ते अरूणोदय कॉलनी ते हरिप्रसादनगर येथील ड्रेनेज लाईनचा निधी वळविण्याबाबत. GBR, Ward & Page No.11, Sr.No.14 रक्कम रुपये २० लक्ष.

**त्याऐवजी**

वॉर्ड क्र.११४ मध्ये विविध विकास कामे करण्यासाठी वळविण्यात यावा.

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.अप्पासाहेब विनायक हिवाळे **अनुमोदक:-**श्री.भादवे रामेश्वर बाबुराव

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.११४, माऊलीनगर येथील नारायणा वंडर्स स्कुल ते अरूणोदय कॉलनी ते हरिप्रसादनगर येथे ड्रेनेज लाईनचा GBR, Ward & Page No.11, Sr.No.14 रक्कम रुपये २० लक्ष या कामाऐवजी वॉर्ड क्र.११४ मध्ये विविध विकास कामे करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ८२१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१९ मधील रहिवासी अब्दुल रशिद अब्दुल गफार हे समाज सेवेच्या माध्यमातून घाटी हॉस्पीटल मध्ये येणारे गोरगरीब लोकांना औषधोपचारासाठी व अन्य कोणत्याही मदतीसाठी अहोरात्र तयार राहतात. त्यांच्या चांगल्या कामामुळे वार्डातील रहिवासीयांच्या मागणीनुसार मोहल्ला आरेफ कॉलनी, गल्ली नं.३ ते हिलाल कॉलनी खामनदी पुलापर्यंत असलेल्या रस्त्यास श्री.अब्दुल रशिद अब्दुल गफार नाव देण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.जमीर अहेमद कादरी **अनुमोदक:-** श्री.सय्यद मतीन रशिद

मा.महापौर :नामकरण करण्या करीता प्रस्ताव येतात परंतु तेथील स्थानिक वातावरण माहित नसते त्यासाठी एक नामकरण समिती नेमून त्या समितीकडे हा प्रस्ताव वर्ग करण्यात येतो.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१९ मधील मोहल्ला आरेफ कॉलनी, गल्ली नं.३ ते हिलाल कॉलनी खामनदी पुलापर्यंत असलेल्या रस्त्यास श्री.अब्दुल रशिद अब्दुल गफार असे नाव देण्याकरीता अशा प्रकरणामध्ये नामकरण समिती स्थापन करून त्या समितीकडे सदरील प्रस्ताव वर्ग करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ८२२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, **जुने काम:-** स्थायी समितीने शिफारस केलेले काम एस.सी.आर. वॉर्ड-बि पेज नं.१०, अ.क्र.१३, वॉर्ड क्र.३४ अंतर्गत विविध ठिकाणी जुनी गटार दुरुस्ती करणे. र.रु.७,५०,०००/- हे काम वळती करून खालील नवीन कामास मंजुरी देणे.

**नवीन काम:** अबरार कॉलनी मधून जाणाऱ्या नाल्यावर श्री.सय्यद अकील यांच्या घरापासून श्री.सय्यद अकबर यांच्या घरापर्यंत येण्या-जाण्यासाठी नवीन पुल बांधण्यात यावा. र.रु.७,५०,०००/-.

करीता, प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्रीमती संगिता सुभाष वाघूले **अनुमोदक:-** श्रीमती नसरीन बेगम समदयार खान

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, स्थायी समितीने शिफारस केलेले काम एस.सी.आर. वॉर्ड-बि पेज नं.१०, अ.क्र.१३, वॉर्ड क्र.३४ अंतर्गत विविध ठिकाणी जुनी गटार दुरुस्ती करणे र.रु.७,५०,०००/- या कामाऐवजी अबरार कॉलनी मधून जाणाऱ्या नाल्यावर श्री.सय्यद अकील यांच्या घरापासून श्री.सय्यद अकबर यांच्या घरापर्यंत नवीन पुल बांधण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ८२३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१४ अंतर्गत गरीब व हातावर काम करणारे कष्टकरी नागरीक मोठ्या प्रमाणात राहतात. या नागरीकांना मुलभूत सोई-सुविधा मागील बऱ्याच वर्षापासून मिळालेल्या नाहीत. या नागरीकांसाठी मुलभूत सोई-सुविधा ड्रेनेज लाईन टाकणे, पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन टाकणे, विद्युत व्यवस्था करणे व रस्त्याचे काम करणे इत्यादीसाठी रक्कम रुपये ०५.०० कोटी रक्कम आवश्यक आहे.

करीता, या वॉर्डाअंतर्गत खालील प्रमाणे मुलभूत सोई-सुविधांची कामे करण्यासाठी अल्पसंख्यांक निधी मधून रक्कम रुपये ५ कोटी निधी उपलब्ध करून देण्या बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

१) वॉर्ड क्र.१४, पडेगांव अंतर्गत ड्रेनेज लाईन टाकणे.
२) वॉर्ड क्र.१४, पडेगांव अंतर्गत पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन टाकणे.
३) वॉर्ड क्र.१४, पडेगांव अंतर्गत विद्युत व्यवस्था करणे.
४) वॉर्ड क्र.१४, पडेगांव अंतर्गत सिमेंट कॉँक्रीट रस्ते तयार करणे.

**सुचक:-** श्री.सुभाष सयाजी शेजवळ **अनुमोदक:-** श्री.रुपचंद लक्ष्मण वाघमारे

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१४, पडेगाव येथे अल्पसंख्यांक निधी मधून खालील प्रमाणे मुलभूत सोई-सुविधांची कामे करण्यासाठी रक्कम रुपये ५ कोटी निधी उपलब्ध करून देण्याच्या कार्यवाहीस मंजुरी देण्यात येते.

१) वॉर्ड क्र.१४, पडेगांव अंतर्गत ड्रेनेज लाईन टाकणे.
२) वॉर्ड क्र.१४, पडेगांव अंतर्गत पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन टाकणे.
३) वॉर्ड क्र.१४, पडेगांव अंतर्गत विद्युत व्यवस्था करणे.
४) वॉर्ड क्र.१४, पडेगांव अंतर्गत सिमेंट कॉँक्रीट रस्ते तयार करणे.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ८२४:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१०५,राहुलनगर, सादातनगर हा गोर-गरीब व मोल मजुरी करणारे रहिवासी असलेले भाग आहे. सदर ठिकाणी मनपाची आर्थिक परिस्थीती बेताची असतांना ठराविक कामासाठी ठराविक तरतुद करण्यात आलेली आहे. त्यामुळे लोकांना मुलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यास फार त्रास होत आहे.

१. राहुलनगर-सादात नगर भागात विविध ठिकाणी विद्युत व्यवस्था करण्यासाठी १० लक्ष रुपये.
२. राहुलनगर येथील गल्ली नं.०५ मध्ये कॉँक्रेटिंग करणे या कामासाठी २० लक्ष रुपये.
३. राहुलनगर येथील गल्ली नं.०६, मध्ये कॉँक्रेटिंग करणे या कामासाठी १० लक्ष रुपये.
४. राहुलनगर गल्ली नं.०७ मध्ये कॉँक्रेटिंग करणे या कामासाठी १० लक्ष रुपये.

वरील कामाचे प्रस्ताव मंजुरीसाठी डी.पी.डी.सी.कडे पाठविण्यासाठी मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.अब्दुल नवीद अब्दुल रशीद **अनुमोदक:-** श्रीमती शेख समिना शेख इलियास
मा.महापौर :प्रस्ताव मंजुर. प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१०५, राहुलनगर, सादातनगर येथे डी.पी.डी.सी.अंतर्गत खालीलप्रमाणे मुलभूत सोई-सुविधांची कामे करण्याकरीता प्रस्ताव डी.पी.डी.सी.कडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते.

१. राहुलनगर-सादात नगर भागात विविध ठिकाणी विद्युत व्यवस्था करण्यासाठी १० लक्ष रुपये.
२. राहुलनगर येथील गल्ली नं.०५ मध्ये कॉंक्रेटिंग करणे या कामासाठी २० लक्ष रुपये.
३. राहुलनगर येथील गल्ली नं.०६, मध्ये कॉंक्रेटिंग करणे या कामासाठी १० लक्ष रुपये.
४. राहुलनगर गल्ली नं.०७ मध्ये कॉंक्रेटिंग करणे या कामासाठी १० लक्ष रुपये.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ८२५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.४१, रहेमानिया कॉलनी हा गोर गरीब व मोल मजुरी करणारे रहिवासी असलेले भाग आहेत. सदर ठिकाणी मनपाची आर्थिक परिस्थीती बेताची असतांना ठराविक कामासाठी ठराविक तरतुद करण्यात आलेली आहे. त्यामुळे लोकांना मुलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यास फार त्रास होत आहे.

१. वैशालीनगर बौध्द विहारात हायमास्ट लाईट व विद्युत व्यवस्था करण्यासाठी १५ लक्ष रुपये.
२. यशोधरा कॉलनी मध्ये कॉंक्रेटिंग करणे या कामासाठी २० लक्ष रुपये.
३. रहेमानिया कॉलनी गल्ली नं.१०-ए, ११-ए, व १२-ए मध्ये कॉंक्रेटिंग करणे या कामासाठी २५ लक्ष रुपये.

वरील कामाचे प्रस्ताव मंजुरीसाठी डी.पी.डी.सी.कडे पाठविण्यासाठी मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.खान इरशाद इब्राहिम **अनुमोदक:-** श्री.अब्दुल नवीद अब्दुल रशीद
मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.४१, रहेमानिया कॉलनी येथे डी.पी.डी.सी. अंतर्गत खालीलप्रमाणे मुलभूत सोई-सुविधांची कामे करण्याकरीता प्रस्ताव डी.पी.डी.सी.कडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते.

१. वैशालीनगर बौध्द विहारात हायमास्ट लाईट व विद्युत व्यवस्था करण्यासाठी १५ लक्ष रुपये.
२. यशोधरा कॉलनी मध्ये कॉंक्रेटिंग करणे या कामासाठी २० लक्ष रुपये.
३. रहेमानिया कॉलनी गल्ली नं.१०-ए, ११-ए, व १२-ए मध्ये कॉंक्रेटिंग करणे या कामासाठी २५ लक्ष रुपये. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ८२६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पातील खालील कामे रद्द करून वॉर्डात आवश्यक असणारे काम करणे बाबत. “लेखाशिर्ष बदलण्यात” यावे. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| रद्द करावयाच्या कामांची नावे | करावायाच्या कामाचे नाव |
|---|---|
| वॉर्ड क्र.९६, मेहरनगर अंतर्गत न्यु गजानन कॉलनी येथील रिलायन्स मॉल ते शिवगंगा कॉम्प्लेक्स पर्यंत जलवाहिनी व अंतर्गत उप-जलवाहिनी टाकणे. र.रु.१०.०० लक्ष. | वॉर्ड क्र.९६ मेहरनगर गारखेडा अंतर्गत विविध ठिकाणी उद्यान विकसित करणे. र.रु.१०.०० लक्ष. |

**सुचक:-**श्रीमती विमल गोविंद केंद्रे **अनुमोदक:-** श्री.गजानन भानुदास मनगटे

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.९६ येथे सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पातील खालील कामाचे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| रद्द करावयाच्या कामांची नावे | करावायाच्या कामाचे नाव |
|---|---|
| वॉर्ड क्र.९६, मेहरनगर अंतर्गत न्यु गजानन कॉलनी येथील रिलायन्स मॉल ते शिवगंगा कॉम्प्लेक्स पर्यंत जलवाहिनी व अंतर्गत उप-जलवाहिनी टाकणे. र.रु.१०.०० लक्ष. | वॉर्ड क्र.९६ मेहरनगर गारखेडा अंतर्गत विविध ठिकाणी उद्यान विकसित करणे. र.रु.१०.०० लक्ष. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ८२७:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.९६ मधील मनपा सन २०१६-१७ अर्थसंकल्प मधील खालील कामाचे लेखाशिर्ष रहिवासीयांच्या सुविधेसाठी बदलण्यात यावे. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

| जुने लेखाशिर्ष | नवीन लेखाशिर्ष |
|---|---|
| वॉर्ड क्र.९६, मेहरनगर, गारखेडा अंतर्गत न्यु गजानन कॉलनी येथे नवीन ड्रेनेज लाईन टाकणे या कामासाठी सदरील र.रु.१० लक्षची निधी वळती करण्यात यावा. | वॉर्ड क्र.९६ अंतर्गत विविध ठिकाणी उद्यान विकसीत करणे. र.रु.१०.०० लक्षचा निधी वळती करण्यात यावा. |

**सुचक:-**श्रीमती विमल गोविंद केंद्रे **अनुमोदक:-** श्री.गजानन भानुदास मनगटे

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.९६ येथे सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पातील खालील कामाचे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते. मंजुरी देण्यात येते.

| जुने लेखाशिर्ष | नवीन लेखाशिर्ष |
|---|---|
| वॉर्ड क्र.९६, मेहरनगर, गारखेडा अंतर्गत न्यु गजानन कॉलनी येथे नवीन ड्रेनेज लाईन टाकणे या कामासाठी सदरील र.रु.१० लक्षची निधी वळती करण्यात यावा. | वॉर्ड क्र.९६ अंतर्गत विविध ठिकाणी उद्यान विकसीत करणे. र.रु.१०.०० लक्षचा निधी वळती करण्यात यावा. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ८२८:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, भारतनगर प्रभाग क्र.११३ मध्ये मोठ्या प्रमाणात कामगार व अत्यंत गरीब वर्गातील (दारिद्र्य रेषेखालील) नागरीक राहत असून तेथे आरोग्य केंद्राची सुविधा नसल्याने नागरीकांना मोठ्या प्रमाणावर त्रास सहन करावा लागत आहे. महानगरपालिका औरंगाबाद विकास नियंत्रण नियमावली नुसार खुल्या जागेवर बांधकाम अनुज्ञेय आहे.

करीता नियमानुसार शिवाजीनगर जे-सेक्टरच्या लगत (Social Facility) च्या जागेवर आरोग्य केंद्रास जागा घेण्याचा ठराव मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

**सुचक:-**श्री.कैलास लक्ष्मण गायकवाड **अनुमोदक:-** श्री.रामेश्वर बाबुराव भादवे

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, भारतनगर, प्रभाग क्र.११३ येथे शिवाजीनगर जे-सेक्टरच्या लगत (Social Facility) च्या जागेवर नियमाप्रमाणे आरोग्य केंद्रासाठी जागा घेण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ८२९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, भारतनगर, शिवाजीनगर, प्रभाग क्र.११३ लगत शिवाजीनगर, सिडको आनंदनगर येथील लोकसंख्या जवळपास २५ ते ३० हजार असून या भागातून जाण्यासाठी सिडकोचा भूखंड क्र.१७, सेक्टर जी मधून लोकांचे जाणे-येणे आहे. या नागरीकांना वापरासाठी दुसरा कोणताही रस्ता उपलब्ध नसल्याने सदरील भूखंड क्र.१७ मधून रस्ता उपलब्ध करून देण्यात यावा. रेडीरेकनर नुसार सदर भूखंडाची किंमत र.रु.१९,५३,२३२/- असून सदरील भुखंडाची किंमत महानगरपालिकेने सिडको कार्यालयास देण्याबाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मान्यतेस्तव सादर.

**सुचक:-** श्री.कैलास लक्ष्मण गायकवाड **अनुमोदक:-** श्री.भादवे रामेश्वर बाबुराव

श्री.रेणुकादास वैद्य :सिडको कडून जागा घेण्याचा हा अशासकीय प्रस्ताव आहे प्रशासनाने लक्ष घालण्याची गरज आहे. प्रशासकीय ठराव आला तर सोयीचे होईल.

श्री.कैलास गायकवाड :नागरीकांना जाण्यासाठी रस्ता नाही ही जागा सिडकोकडे विना मुल्य मागणी केली होती परंतु सिडकोने कळविले की मोबदला दिला तरच जागा मिळेल.मनपाचे सिडकोकडे विकास शुल्क पोटी मोठी रक्कम येणे आहे.त्यातून ही रक्कम वळती करून घ्यावी व ही जागा घेऊन नागरीकांना रस्ता करून देण्यात यावा.

श्री.त्र्यंबक तुपे :किंमत कशावरून काढली हा मुद्दा येईल प्रशासनाकडून प्रस्ताव यावा.

श्री.रेणुकादास वैद्य :रेडीरेकनरचे रेट किती सिडकोला पैसे द्यावे किंवा कसे या बाबत प्रशासनाने चर्चा करून निर्णय घेतला पाहिजे.शासनाच्या स्तरावर हस्तांतर झाले तर योग्य होईल मनपाचे पैसे खर्च होणार नाही. सिडको प्रशासनाशी चर्चा करून प्रशासकीय प्रस्ताव यावा.

मा.महापौर :या प्रस्तावाबाबत मा.आयुक्त यांनी तेथील रेडीरेकनरचे रेट काय आहेत? याची शहानिशा करून नियमानुसार कार्यवाही करावी. विषय मंजुर करण्यात येतो.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.११३ लगत शिवाजीनगर, सिडको आनंदनगर येथील सिडकोचा भुखंड क्र.१७, सेक्टर जी मधून रस्ता उपलब्ध करून देण्यासाठी तेथील रेडीरेकनरचे रेट काय आहेत? याची प्रशासनाने शहानिशा करून नियमानुसार कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ८३०:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.५३ मधील मनपा अर्थसंकल्प सन २०१६-१७ मधील खालील विकास कामाचे लेखाशिर्ष रहिवासीयांच्या सुविधेसाठी बदलण्यात यावा म्हणून प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

| पान क्रमांक व अनुक्रमांक | मनपा अर्थसंकल्प सन २०१६-१७ मधील मंजुर काम | नवीन लेखाशिर्ष या कामासाठी निधी वळती करण्यात यावा. |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| SCR-Ward-D P.No.27 S.No.05 | औरंगपुरा ते जिल्हा परिषद मैदान भागातील नाल्याच्या संरक्षित भिंतीची दुरुस्ती करून लोखंडी जाळ्या बसविणे. आर्थिक तरतुद रुपये ०५ लक्ष, | वॉर्ड क्र.५३, कामगार कॉलनी येथे ड्रेनेज लाईन टाकणे. या कामासाठी लेखाशिर्ष बदली करून आर्थिक तरतुद वळती करण्यात यावी. |

**सुचक:-** श्रीमती बबिता विजय चावरिया **अनुमोदक:-** श्री.भादवे रामेश्वर बाबुराव

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.५३ मधील मनपा अर्थसंकल्प सन २०१६-१७ मधील खालील विकास कामाचे लेखाशिर्ष रहिवासीयांच्या सुविधेसाठी बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| पान क्रमांक व अनुक्रमांक | मनपा अर्थसंकल्प सन २०१६-१७ मधील मंजुर काम | नवीन लेखाशिर्ष या कामासाठी निधी वळती करण्यात यावा. |
|---|---|---|
| SCR-Ward-D P.No.27 S.No.05 | औरंगपुरा ते जिल्हा परिषद मैदान भागातील नाल्याच्या संरक्षित भिंतीची दुरुस्ती करून लोखंडी जाळ्या बसविणे. आर्थिक तरतुद रुपये ०५ लक्ष, | वॉर्ड क्र.५३, कामगार कॉलनी येथे ड्रेनेज लाईन टाकणे. या कामासाठी लेखाशिर्ष बदली करून आर्थिक तरतुद वळती करण्यात यावी. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ८३१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.५३ मधील मनपा अर्थसंकल्प सन २०१६-१७ मधील खालील विकास कामाचा लेखाशिर्ष रहिवासीयांच्या सुविधेसाठी बदलण्यात यावा म्हणून प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

| पान क्रमांक व अनुक्रमांक | मनपा अर्थसंकल्प सन २०१६-१७ मधील मंजुर काम | नवीन लेखाशिर्ष या कामासाठी निधी वळती करण्यात यावा. |
|---|---|---|
| SCR-Ward-D P.No.27 S.No.06 | जिल्हा परिषद मैदान ते स्वातंत्र्य सैनिक कॉलनी भागातील नाल्याच्या संरक्षित भिंतीची दुरुस्ती करून लोखंडी जाळ्या बसविणे. आर्थिक तरतुद रुपये ०५ लक्ष, | वॉर्ड क्र.५३, कामगार कॉलनी येथे सिमेंट कॉंक्रेट रस्ते करणे. या कामासाठी लेखाशिर्ष बदली करून आर्थिक तरतुद वळती करण्यात यावी. |

**सुचक:-** श्रीमती बबिता विजय चावरिया **अनुमोदक:-** श्री.भादवे रामेश्वर बाबुराव

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.५३ येथे मनपा अर्थसंकल्प सन २०१६-१७ मधील खालील विकास कामाचा लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| पान क्रमांक व अनुक्रमांक | मनपा अर्थसंकल्प सन २०१६-१७ मधील मंजुर काम | नवीन लेखाशिर्ष या कामासाठी निधी वळती करण्यात यावा. |
|---|---|---|
| SCR-Ward-D P.No.27 S.No.06 | जिल्हा परिषद मैदान ते स्वातंत्र्य सैनिक कॉलनी भागातील नाल्याच्या संरक्षित भिंतीची दुरुस्ती करून लोखंडी जाळ्या बसविणे.आर्थिक तरतुद रुपये ०५ लक्ष. | वॉर्ड क्र.५३, कामगार कॉलनी येथे सिमेंट कॉंक्रेट रस्ते करणे. या कामासाठी लेखाशिर्ष बदली करून आर्थिक तरतुद वळती करण्यात यावी. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ८३२:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.५३ मधील मनपा अर्थसंकल्प सन २०१६-१७ मधील खालील विकास कामाचे लेखाशिर्ष रहिवासीयांच्या सुविधेसाठी बदलण्यात यावा म्हणून प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

| पान क्रमांक व अनुक्रमांक | मनपा अर्थसंकल्प सन २०१६-१७ मधील मंजुर काम | नवीन लेखाशिर्ष या कामासाठी निधी वळती करण्यात यावा. |
|---|---|---|
| SCR-Ward-D P.No.27 S.No.04 | दलालवाडी, गोमटेश मार्केट भागातील नाल्याच्या संरक्षित भिंतीची दुरुस्ती करून लोखंडी जाळ्या बसविणे. आर्थिक तरतुद रुपये ०५ लक्ष, | वॉर्ड क्र.५३, औरंगपूरा येथे ड्रेनेज लाईन टाकणे. या कामासाठी लेखाशिर्ष बदली करून आर्थिक तरतुद वळती करण्यात यावी. |

**सुचक:-** श्रीमती बबिता विजय चावरिया **अनुमोदक:-** श्री.भादवे रामेश्वर बाबुराव

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.५३ मधील मनपा अर्थसंकल्प सन २०१६-१७ मधील खालील विकास कामाचे लेखाशिर्ष रहिवासीयांच्या सुविधेसाठी बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| पान क्रमांक व अनुक्रमांक | मनपा अर्थसंकल्प सन २०१६-१७ मधील मंजुर काम | नवीन लेखाशिर्ष या कामासाठी निधी वळती करण्यात यावा. |
|---|---|---|
| SCR-Ward-D P.No.27 S.No.04 | दलालवाडी, गोमटेश मार्केट भागातील नाल्याच्या संरक्षित भिंतीची दुरुस्ती करून लोखंडी जाळ्या बसविणे. आर्थिक तरतुद रुपये ०५ लक्ष, | वॉर्ड क्र.५३, औरंगपूरा येथे ड्रेनेज लाईन टाकणे. या कामासाठी लेखाशिर्ष बदली करून आर्थिक तरतुद वळती करण्यात यावी. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

मा.महापौर :ऐनवेळचे विषय आलेले आहे त्यात लेखा शिर्ष बदलाचे प्रस्ताव आहे ते सर्व दुरूस्तीसह मंजूर करण्यात येते.

**<u>विषय क्रमांक ८३३:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, २ ऑक्टोबर-२०१४ रोजी केंद्र शासनाने सर्व भारत देशभरात स्वच्छ भारत अभियानाची राष्ट्रीय चळवळीच्या स्वरुपात सुरुवात केली. स्वच्छ व हागणदारीमुक्त भारत ही महात्मा गांधीजींच्या १५० व्या जयंतीला म्हणजे २ ऑक्टोबर २०१९ ला दिलेली सर्वश्रेष्ठ श्रध्दांजली असेल असे भारताचे मा.पंतप्रधान, श्री.नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे. त्यामुळे २ ऑक्टोबर २०१९ रोजी महात्मा गांधी यांची १५० वी जयंती रोजी भारत देश स्वच्छ व हागणदारी मुक्त (Open Defecation Free) करावयाचा आहे. औरंगाबाद शहरात स्वच्छ अभियानाची सुरुवात २ ऑक्टोबर २०१४ पासून झाली आहे. ३१ मार्च २०१७ रोजी महाराष्ट्र व पर्यायाने औरंगाबाद शहर हागणदारीमुक्त म्हणून घोषित करावयाचे आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेने वॉर्डनिहाय ODF वॉर्ड घोषित करावयाचे धोरण अवलंबिले आहे. शासनाने जाहीर केलेल्या प्रोटोकॉलनुसार संबंधीत वॉर्डमधील शाळांचे विद्यार्थी, शाळा, शिक्षक व शिक्षकेतर वर्ग, महिला बचतगट आणि स.नगरसेवक यांचेकडून उघड्यावर शौचास जात नसल्या

संदर्भात विहीत नमुन्यातील घोषणापत्र प्रमाणित करून घेण्यात आलेले असून संचिकेत जोडण्यात आलेले आहेत. त्या संदर्भात सार्वजनिक अधिसूचना (Public Notification) तयार करुन पंधरा दिवसांच्या मुदतीमध्ये जनतेच्या हरकती/आक्षेप (Objection/feedback) मागवावयाच्या आहेत.

वॉर्ड १ ते ९ अंतर्गत एकूण ४४ निवडणूक वॉर्ड Open Defecation Free (ODF) करण्यासाठीच्या जनतेच्या हरकती/आक्षेप मागविण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ/मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, २ ऑक्टोबर-२०१४ रोजी केंद्र शासनाने सर्व भारत देशभरात स्वच्छ भारत अभियानाची राष्ट्रीय चळवळीच्या स्वरुपात सुरुवात केली असून ३१ मार्च २०१७ रोजी महाराष्ट्र व पर्यायाने औरंगाबाद शहर हागणदारीमुक्त म्हणून घोषित करावयाचे असल्याने औरंगाबाद महानगरपालिकेने वॉर्डनिहाय ODF वॉर्ड घोषित करावयाचे धोरण अवलंबिले व शासनाने जाहीर केलेल्या प्रोटोकॉलनुसार संबंधीत वॉर्डमधील शाळांचे विद्यार्थी, शाळा, शिक्षक व शिक्षकेतर वर्ग, महिला बचतगट आणि स.नगरसेवक यांचेकडून उघड्यावर शौचास जात नसल्या संदर्भात विहीत नमुन्यातील घोषणापत्र प्रमाणित करून घेण्यात आलेले असून त्या संदर्भात सार्वजनिक अधिसूचना (Public Notification) तयार करुन पंधरा दिवसांच्या मुदतीमध्ये वॉर्ड १ ते ९ अंतर्गत एकूण ४४ निवडणूक वॉर्ड Open Defecation Free (ODF) करण्यासाठीच्या जनतेच्या हरकती/आक्षेप मागविण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ८३४:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.६१, अल्तमश कॉलनी, दरबार हॉटेल ते राम मंदिर ट्रिमिक्स काँक्रीटींग करणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन २०१५-२०१६ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून अंदाजपत्रकीय रक्कम रु.९९,९०,२०५/- चे तयार करण्यात आले आहे. प्रस्तावीत कामाचा खर्च मा.महापौर यांनी सुचविलेली अत्यावश्यक कामे या लेखाशिर्ष अंतर्गत पान क्र.ई-५८, अ.क्र.८ मधील १.०० कोटीची तरतुद उपलब्ध आहे. प्रस्तावीत अंदाजपत्रकात रस्त्यास, वेट मिक्स करणे, व्हाईट टॉपींग करणे इत्यादी बाबींचा समावेश करण्यात आलेला आहे. सदर अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करून मा.सर्वसाधारण सभेत प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर करणे बाबत शिफारस आहे.

करीता, प्रस्तावीत कामाचे रक्कम रु.९९,९०,२०५/-चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.६१, अल्तमश कॉलनी, दरबार हॉटेल ते राम मंदिर ट्रिमिक्स काँक्रीटींग करणे या प्रस्तावीत कामाचे तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.९९,९०,२०५/-च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ८३५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.११३ मधील शिवाजीनगर बाराव्या योजने पासुन ते मुकूंदवाडी रेल्वेस्टेशनकडे जाणाऱ्या विकास योजनेतील रस्त्याचे व्हाईट टॉपिंग करणे बाबत या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसूची सन २०१५-२०१६ नुसार रक्कम रु.७५,८५,६००/-

चे तयार करण्यात आले आहे. सदर अंदाजपत्रकास दि.१५.१२.२०१६ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

सदर कामासाठी लागणारा खर्च अर्थसंकल्प सन २०१६-२०१७ मधील विकास योजनेअंतर्गत रस्ते मजबुतीकरण करणे व नविन डांबरी रस्ते पृष्ठ क्र.ई-५८ मध्ये अ.क्र.०२ मधील ई-६६ अ.क्र.०२ नुसार तरतुद उपलब्ध आहे. करिता, सदरील कामांचे अंदाजपत्रक रक्कम रू.७५,८५,६००/- मंजुरीबाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.११३ मधील शिवाजीनगर बाराव्या योजने पासुन ते मुकूंदवाडी रेल्वेस्टेशनकडे जाणाऱ्या विकास योजनेतील रस्त्याचे व्हाईट टॉपिंग करणे या कामाचे तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.७५,८५,६००/-च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ८३६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.३२, आंबेडकरनगर, जाधववाडी मधील दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत खालील विकास कामे करण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | विकास कामे | रुपये (लक्ष) |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.३२, आंबेडकरनगर, जाधववाडी मधील स्मशानभुमी मध्ये पेव्हर ब्लॉक बसविणे | १० लक्ष |
| २. | वॉर्ड क्र.३२, आंबेडकरनगर, जाधववाडी मधील गल्ली नं.०८ मध्ये सिमेंट कॉंक्रीट रस्ता बनविणे | ८.५ लक्ष |
| ३. | वॉर्ड क्र.३२, आंबेडकरनगर, जाधववाडी मधील गल्ली नं.११ मध्ये सिमेंट कॉंक्रीट रस्ता बनविणे. | ८ लक्ष |
| | **एकूण** | २६.५ लक्ष |

**सुचक:-**श्रीमती भारती महेंद्र सोनवणे **अनुमोदक:-**श्रीमती विजया संजय बनकर

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.३२, आंबेडकरनगर, जाधववाडी मधील दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत खालील विकास कामे करण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | विकास कामे | रुपये (लक्ष) |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.३२, आंबेडकरनगर, जाधववाडी मधील स्मशानभुमी मध्ये पेव्हर ब्लॉक बसविणे. | १० लक्ष |
| २. | वॉर्ड क्र.३२, आंबेडकरनगर, जाधववाडी मधील गल्ली नं.०८ मध्ये सिमेंट कॉंक्रीट रस्ता बनविणे. | ८.५ लक्ष |
| ३. | वॉर्ड क्र.३२, आंबेडकरनगर, जाधववाडी मधील गल्ली नं.११ मध्ये सिमेंट कॉंक्रीट रस्ता बनविणे. | ८ लक्ष |
| | **एकूण** | २६.५ लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ८३७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.२७, शताब्दीनगर या वॉर्डाअंतर्गत येणाऱ्या दलित वसाहती मध्ये शासनाच्या दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत खालील कामांना निधी प्राप्त होणेसाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रस्ताव पाठविणेसाठी मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | नांव | अ.प.रक्कम |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.२७, शताब्दीनगर अंतर्गत खुनी दरवाजा ते मनपा शौचालयापर्यंत ट्रिमिक्स कॉंक्रीट रस्ता तयार करणे. | ४०.०० लक्ष |
| २. | वॉर्ड क्र.२७, शताब्दीनगर अंतर्गत श्री.किशारे पगारे ते श्री.राहुल बोर्डे यांच्या घरापर्यंत नविन ड्रेनेज लाईन टाकणे. | १०.०० लक्ष |
| ३. | वॉर्ड क्र.२७, शताब्दीनगर अंतर्गत श्री.रमेश दाभाडे ते श्री.बाळु देहाडे यांच्या घरापर्यंत तसेच शताब्दीनगर अंतर्गत विविध भागात ट्रिमिक्स कॉंक्रीट रस्ता तयार करणे. | ५०.०० लक्ष |

**सुचक:-** श्री.जहागीर खान अब्बास खान मुलानी **अनुमोदक:-** श्री. खैरे ऋषिकेश चंद्रकांत

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.२७, शताब्दीनगर या वॉर्डाअंतर्गत येणाऱ्या दलित वसाहती मध्ये शासनाच्या दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत खालील कामांना निधी प्राप्त होणेसाठी प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | नांव | अ.प.रक्कम |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.२७, शताब्दीनगर अंतर्गत खुनी दरवाजा ते मनपा शौचालय पर्यंत ट्रिमिक्स कॉंक्रीट रस्ता तयार करणे. | ४०.०० लक्ष |
| २. | वॉर्ड क्र.२७, शताब्दीनगर अंतर्गत श्री.किशारे पगारे ते श्री.राहुल बोर्डे यांच्या घरापर्यंत नविन ड्रेनेज लाईन टाकणे. | १०.०० लक्ष |
| ३. | वॉर्ड क्र.२७, शताब्दीनगर अंतर्गत श्री.रमेश दाभाडे ते श्री.बाळु देहाडे यांच्या घरापर्यंत तसेच शताब्दीनगर अंतर्गत विविध भागात ट्रिमिक्स कॉंक्रीट रस्ता तयार करणे. | ५०.०० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ८३८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.३३, मिसरवाडी हा वॉर्ड दलित वसाहत असल्यामुळे महाराष्ट्र शासनाच्या नागरी दलित वस्ती सुधार योजनेचा निधी मिसरवाडी परिसरात विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी रु.२५ लक्ष निधी व मिसरवाडी वॉर्डात विविध ठिकाणी सिमेंट कॉंक्रेट रस्ता तयार करण्याकरीता रु.७५ लक्ष निधी असा एकुण र.रु.१ कोटीचा निधी उपलब्ध होण्याकरीता मा.जिल्हाधिकारी कार्यालयाकडे हा प्रस्ताव पाठविण्याकरीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती शबनम बेगम कलीम कुरेशी **अनुमोदक:-**श्रीमती खतीजा कुरैशी छोटू कुरैशी

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.३३, मिसरवाडी येथे महाराष्ट्र शासनाच्या नागरी दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी रु.२५ लक्ष व विविध ठिकाणी

सिमेंट कॉंक्रेट रस्ता तयार करण्याकरीता रु.७५ लक्ष असा एकुण र.रु.१ कोटीचा निधी उपलब्ध होण्याकरीता प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ८३९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.०४, चेतनानगर, राजनगर मधील दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत खालील विकास कामे करण्यासाठीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | कामाचे नाव | रक्कम |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.०४, चेतनानगर, राजनगर अंतर्गत विविध ठिकाणी सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे. | ७० लक्ष |
| २. | वॉर्ड क्र.०४, चेतनानगर, राजनगर अंतर्गत विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे. | ३० लक्ष |

**सुचक:-**श्रीमती ज्योती जयेश अभंग **अनुमोदक:-**श्री.रुपचंद लक्ष्मण वाघमारे

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.०४, चेतनानगर, राजनगर येथे दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत खालील विकास कामे करण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | कामाचे नाव | रक्कम |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.०४, चेतनानगर, राजनगर अंतर्गत विविध ठिकाणी सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे. | ७० लक्ष |
| २. | वॉर्ड क्र.०४, चेतनानगर, राजनगर अंतर्गत विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे. | ३० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ८४०:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१३, भिमनगर (उत्तर), भावसिंगपूरा येथे दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत विविध ठिकाणी रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करण्याकरीता रु.१ कोटी निधी उपलब्ध होण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती आशा विजय निकाळजे **अनुमोदक:-**श्री.रुपचंद लक्ष्मण वाघमारे

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१३, भिमनगर (उत्तर), भावसिंगपूरा येथे दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत विविध ठिकाणी रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करण्याकरीता रु.१ कोटी निधी उपलब्ध होण्यासाठी प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ८४१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.०३, एकतानगर मधील दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत विविध ठिकाणी खालील विकास कामे करण्यासाठीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | कामाचे नाव | रक्कम |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.०३ एकतानगर अंतर्गत विविध ठिकाणी सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे. | ७० लक्ष |

| | | |
|---|---|---|
| २. | वॉर्ड क्र.०३ एकतानगर अंतर्गत विविध ठिकाणी जलवाहिनी टाकणे. | २० लक्ष |
| ३. | वॉर्ड क्र.०३ एकतानगर अंतर्गत विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे. | १० लक्ष |

**सुचक:-**श्री. वाघमारे रुपचंद लक्ष्मण **अनुमोदक:-**श्री.विकास प्रकाश एडके
मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.०३, एकतानगर येथे विविध ठिकाणी दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत खालील विकास कामे करण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | कामाचे नाव | रक्कम |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.०३ एकतानगर अंतर्गत विविध ठिकाणी सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे. | ७० लक्ष |
| २. | वॉर्ड क्र.०३ एकतानगर अंतर्गत विविध ठिकाणी जलवाहिनी टाकणे. | २० लक्ष |
| ३. | वॉर्ड क्र.०३ एकतानगर अंतर्गत विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे. | १० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ८४२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.५३, औरंगपुरा अंतर्गत परिसरात दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत खालील विकास कामांसाठी निधी उपलब्ध होण्याकरीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | कामांचे नाव | निधी |
|---|---|---|
| १. | दलालवाडी अंतर्गत ड्रेनेज व सिमेंट कॉंक्रीटींग करणे. | र.रु.२० लक्ष |
| २. | जरिपुरा गांधीनगर अंतर्गत सिमेंट कॉंक्रीटींग करणे. | र.रु.२० लक्ष |
| ३. | पैठणगेट बुध्दविहार अंतर्गत सिमेंट कॉंक्रीटींग करणे. | र.रु.२० लक्ष |

**सुचक:-**श्रीमती बबीता विजय चावरिया **अनुमोदक:-**श्री. भादवे रामेश्वर बाबुराव
मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.५३, औरंगपुरा येथे दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत खालील विकास कामांसाठी निधी मिळण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | कामांचे नाव | निधी |
|---|---|---|
| १. | दलालवाडी अंतर्गत ड्रेनेज व सिमेंट कॉंक्रीटींग करणे. | र.रु.२० लक्ष |
| २. | जरिपुरा गांधीनगर अंतर्गत सिमेंट कॉंक्रीटींग करणे. | र.रु.२० लक्ष |
| ३. | पैठणगेट बुध्दविहार अंतर्गत सिमेंट कॉंक्रीटींग करणे. | र.रु.२० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ८४३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पातील खालील काम करण्यासाठी आर्थीक तरतुद करण्यात आलेली होती. सदरील काम पुर्ण झाल्यानंतर शिल्लक राहिलेल्या रक्कमेतून दुसरे विकास काम करण्यासाठी लेखाशिर्ष बदलाचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | रद्द करावयाच्या कामाचे नाव | करावयाच्या कामाचे नाव |
|---|---|---|
| ०१ | मा.सर्वसाधारण सभा दि.१९.११.२०१६ ठराव क्र.७१२ अन्वये मुकूल मंदिर शाळे समोरील | १. मुकूल मंदीर शाळेसमोरील रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करण्यासाठी र.रु.१० लक्ष |

| | | |
|---|---|---|
| | रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करण्यासाठी र.रु.१० लक्ष तरतुद करण्यात आलेली होती. त्यापैकी र.रु.६,३२,५००/- रक्कम खर्च झालेली असून र.रु.३,६७,५००/- शिल्लक आहे. | तरतुद करण्यात आलेली होती. त्यापैकी र.रु.६,३२,५००/- रक्कम खर्च झालेली असून र.रु.३,६७,५००/- शिल्लक रक्कमेतून आयोध्यानगर एफ ५४/१२ ते एफ ५३/१२ या ठिकाणी संरक्षित भींत बांधण्यासाठी खर्च करणे. |

**सुचक:-**श्रीमती सुरेखा गौतम खरात **अनुमोदक:-**श्रीमती सुनिता रामराव चव्हाण
मा.महापौर :प्रस्ताव मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पातील शिल्लक राहिलेल्या रक्कमेतून नियमाप्रमाणे दुसरे विकास काम करण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | रद्द करावयाच्या कामाचे नाव | करावयाच्या कामाचे नाव |
|---|---|---|
| ०१ | मा.सर्वसाधारण सभा दि.१९.११.२०१६ ठराव क्र.७१२ अन्वये मुकूल मंदिर शाळे समोरील रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करण्यासाठी र.रु.१० लक्ष तरतुद करण्यात आलेली होती. त्यापैकी र.रु.६,३२,५००/- रक्कम खर्च झालेली असून र.रु.३,६७,५००/- शिल्लक आहे. | १. मुकूल मंदीर शाळेसमोरील रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करण्यासाठी र.रु.१० लक्ष तरतुद करण्यात आलेली होती. त्यापैकी र.रु.६,३२,५००/- रक्कम खर्च झालेली असून र.रु.३,६७,५००/- शिल्लक रक्कमेतून आयोध्यानगर एफ ५४/१२ ते एफ ५३/१२ या ठिकाणी संरक्षित भींत बांधण्यासाठी खर्च करणे. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ८४४:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.३९, अयोध्यानगर या वॉर्डात ५०% पेक्षा जास्त दलित लोकसंख्या आहे. “शासनाच्या दलित वस्ती सुधार योजने” अंतर्गत या प्रभागातील मुलभूत सोई-सुविधा नागरी सुविधा पुरविण्यासाठी र.रु.६० लक्षचा निधी आवश्यक आहे.

करीता वॉर्ड क्र.३९, अयोध्यानगर या वॉर्डात मुलभूत नागरी सोई-सुविधा पुरविण्यासाठी शासनाच्या दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत विविध ठिकाणी कॉंक्रीट रस्ते, पथदिवे, ड्रेनेज लाईन इत्यादी कामे करण्यासाठी र.रु.६० लक्षचा निधी उपलब्ध होण्यासाठी मा.जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती सुरेखा गौतम खरात **अनुमोदक:-**श्री.राजगौरव हरिदास वानखेडे
मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.३९, अयोध्यानगर या वॉर्डात मुलभूत नागरी सोई-सुविधा पुरविण्यासाठी “शासनाच्या दलित वस्ती सुधार योजने” अंतर्गत विविध ठिकाणी कॉंक्रीट रस्ते, पथदिवे, ड्रेनेज लाईन इत्यादी कामे करण्यासाठी र.रु.६० लक्षचा निधी उपलब्ध होण्यासाठी प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ८४५:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.३७ अंतर्गत बकाल गल्ली, (स्वामी समर्थ नगर) सावित्रीबाई फुले नगर ह्या दोन दलित वस्ती घोषित असून या भागात मुलभूत नागरी सोई-सुविधा

पुरविण्यासाठी बकाल गल्ली, स्वामी समर्थनगर येथे कॉंक्रीट रस्ते करण्याकरीता र.रु.२५ लक्ष व सावित्रीबाई फुलेनगर येथे खडीकरण करण्याकरीता र.रु.२५ लक्ष निधी उपलब्ध करून देण्यात यावा.

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती वैशाली कारभारी जाधव **अनुमोदक:-**श्री.सोहेल शकील शेख

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.३७ येथे शासनाच्या दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत बकाल गल्ली, स्वामी समर्थनगर येथे कॉंक्रीट रस्ते करण्याकरीता र.रु.२५ लक्ष व सावित्रीबाई फुलेनगर येथे खडीकरण करण्याकरीता र.रु.२५ लक्षचा निधी उपलब्ध होण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ८४६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मनपा सर्वसाधारण सभा दि.१९.११.२०१६ मधील मंजुर विषय क्र.७३१ अन्वये वॉर्ड क्र.११ मध्ये विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी अल्पसंख्यांक निधीतुन सदरील काम करण्यास रक्कम रुपये ५० लक्ष मंजुर करण्यात आलेले होते. तथापी, या कामात विद्युतीकरणाचे काम करणे अत्यंत आवश्यक असल्याने खालील प्रमाणे लेखाशिर्षात बदल करण्यात यावा म्हणून प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

| मंजुर विषयातील काम | या कामासाठी लेखाशिर्ष बदलण्यात यावे. |
|---|---|
| वॉर्ड क्र.११ मध्ये विविध ठिकाणी अल्पसंख्यांक निधीतुन ड्रेनेज लाईन टाकणे.<br>आर्थिक तरतुद ५० लक्ष रुपये. | वॉर्ड क्र.११ अंतर्गत विविध ठिकाणी नवीन पोल व फिटींग व इतर विद्युत दुरुस्तीचे कामे करणे.<br>या कामासाठी निधीतुन ३० लक्ष रुपये वळती करण्यात यावे. |

**सुचक:-** श्री. खान अय्युब म.हुसेन खान **अनुमोदक:-** श्री. जहागीरदार मोहम्मद अयुब गुलाम जिलानी

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.११ मध्ये खालील प्रमाणे लेखाशिर्षात बदल करण्यासमंजुरी देण्यात येते.

| मंजुर विषयातील काम | या कामासाठी लेखाशिर्ष बदलण्यात यावे. |
|---|---|
| वॉर्ड क्र.११ मध्ये विविध ठिकाणी अल्पसंख्यांक निधीतुन ड्रेनेज लाईन टाकणे.<br>आर्थिक तरतुद ५० लक्ष रुपये. | वॉर्ड क्र.११ अंतर्गत विविध ठिकाणी नवीन पोल व फिटींग व इतर विद्युत दुरुस्तीचे कामे करणे.<br>या कामासाठी निधीतुन ३० लक्ष रुपये वळती करण्यात यावे. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ८४७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मनपा अर्थसंकल्प सन २०१६-१७ मधील वॉर्ड क्र.२३ मधील खालील कामाचे लेखाशिर्ष रहिवासीयांच्या सुविधेसाठी बदलण्यात यावे. करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| पान क्र. व अ.क्र. | सन २०१६-१७ मधील लेखाशिर्ष | नविन लेखाशिर्ष |
|---|---|---|
| जीबीआर-वॉर्ड-ए, पान क्र.१, | वॉर्ड क्र.२३, काचीवाडा भागात रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणे. | वॉर्ड क्र.२३, चेलीपुरा अंतर्गत ड्रिमलँड लॉज ते नुरानी मस्जीद पर्यंत सिमेंट |

| | | |
|---|---|---|
| अ.क्र.८ | र.रु.१५ लक्ष | कॉंक्रेट रस्ता तयार करणे. या कामासाठी १५ लक्ष रुपये वळती करण्यात यावे. |

**सुचक:-** श्रीमती खान सायरा बानो अजमल **अनुमोदक:-** श्री.सय्यद मतीन रशीद
मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.२३ मधील खालील कामाचे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| पान क्र. व अ.क्र. | सन २०१६-१७ मधील लेखाशिर्ष | नविन लेखाशिर्ष |
|---|---|---|
| जीबीआर-वॉर्ड-ए, पान क्र.१, अ.क्र.८ | वॉर्ड क्र.२३, काचीवाडा भागात रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणे. र.रु.१५ लक्ष | वॉर्ड क्र.२३, चेलीपुरा अंतर्गत ड्रिमलॅंड लॉज ते नुरानी मस्जीद पर्यंत सिमेंट कॉंक्रेट रस्ता तयार करणे. या कामासाठी १५ लक्ष रुपये वळती करण्यात यावे. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ८४८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.७९ न्यायनगर मधील खालील दर्शविलेल्या कामाचे लेखाशिर्षक बदलण्या बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | पान क्र. | जुने कामांचे नाव | नविन कामांचे नाव | निधी |
|---|---|---|---|---|
| २४ | GBR-WARD-E-P.NO.03 | वॉर्ड क्र.७९, गल्ली क्र.०६ हुसैन कॉलनी येथील जावेद पत्रकार यांच्या गल्लीत कॉंक्रीटींग करणे. | न्यायनगर वॉर्डातील पुंडलीक नगर (पश्चिम) येथील गल्ली नं.१अ, १ गल्ली मध्ये जलवाहीनी टाकणे. | १२ लक्ष |

**सुचक:-** श्री.गजानन भानुदास मनगटे **अनुमोदक:-** श्रीमती आशा नरेश भालेराव
मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.७९ न्यायनगर मधील खालील कामाचे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | पान क्र. | जुने कामांचे नाव | नविन कामांचे नाव | निधी |
|---|---|---|---|---|
| २४ | GBR-WARD-E-P.NO.03 | वॉर्ड क्र.७९, गल्ली क्र.०६ हुसैन कॉलनी येथील जावेद पत्रकार यांच्या गल्लीत कॉंक्रीटींग करणे. | न्यायनगर वॉर्डातील पुंडलीक नगर (पश्चिम) येथील गल्ली नं.१अ, १ गल्ली मध्ये जलवाहीनी टाकणे. | १२ लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ८४९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.७९ न्यायनगर मधील खालील दर्शविलेल्या कामाचे लेखाशिर्ष बदलण्या बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | पान क्र. | जुने कामांचे नाव | नविन कामांचे नाव | निधी |
|---|---|---|---|---|
| २१ | GBR-WARD-E-P.NO.03 | वॉर्ड क्र.७९, गल्ली क्र.०१ हुसैन कॉलनी, मकसुद भाई ते काथार गल्ली अंतर्गत कॉंक्रीटींग करणे. | न्यायनगर वॉर्डातील पुंडलीक नगर (पश्चिम) येथील गल्ली नं.१अ, १ व २ गल्लील मध्ये ड्रेनेज लाईन टाकणे. | ०५ लक्ष |
| २२ | GBR-WARD-E-P.NO.03 | वॉर्ड क्र.७९, गल्ली क्र.०२, हुसैन कॉलनी, रझ्झाक शहा ते अंतर्गत श्री.शेख सलीम यांच्या घरापर्यंत कॉंक्रीटींग करणे. | | ०६ लक्ष |
| २३ | GBR-WARD-E-P.NO.03 | वॉर्ड क्र.७९, गल्ली क्र.०७, नेहरुनगर येथील जनसेवा किराणा ते श्री.हमीद भाई यांच्या घरापर्यंत कॉंक्रीटींग करणे. | | ०७ लक्ष |
| | | | **एकुण** | **१८ लक्ष** |

करीता, उपरोक्त दर्शविल्यानुसार विकास कामांच्या बदलास मान्यता देण्यात यावी.

**सुचक:-** श्री.गजानन भानुदास मनगटे **अनुमोदक:-** श्रीमती आशा नरेश भालेराव

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात येते. वॉर्ड क्र.७९ न्यायनगर मधील खालील दर्शविलेल्या कामाचे लेखाशिर्ष बदलण्या बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | पान क्र. | जुने कामांचे नाव | नविन कामांचे नाव | निधी |
|---|---|---|---|---|
| २१ | GBR-WARD-E-P.NO.03 | वॉर्ड क्र.७९, गल्ली क्र.०१ हुसैन कॉलनी, मकसुद भाई ते काथार गल्ली अंतर्गत कॉंक्रीटींग करणे. | न्यायनगर वॉर्डातील पुंडलीक नगर (पश्चिम) येथील गल्ली नं.१अ, १ व २ गल्लील मध्ये ड्रेनेज लाईन टाकणे. | ०५ लक्ष |
| २२ | GBR-WARD-E-P.NO.03 | वॉर्ड क्र.७९, गल्ली क्र.०२, हुसैन कॉलनी, रझ्झाक शहा ते अंतर्गत श्री.शेख सलीम यांच्या घरापर्यंत कॉंक्रीटींग करणे. | | ०६ लक्ष |
| २३ | GBR-WARD-E-P.NO.03 | वॉर्ड क्र.७९, गल्ली क्र.०७, नेहरुनगर येथील जनसेवा किराणा ते श्री.हमीद भाई यांच्या घरापर्यंत कॉंक्रीटींग करणे. | | ०७ लक्ष |
| | | | **एकुण** | **१८ लक्ष** |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ८५०:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पामधील खालील कामे रद्द करून लेखाशिर्ष बदलण्यात यावे. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव सादर.

| रद्द करावयाची कामे | करावयाची कामाचे नाव |
|---|---|
| वॉर्ड क्र.१३, भिमनगर (उत्तर), भावसिंगपूरा अंतर्गत मनपा शाळेजवळील गल्लीतील विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन बदलणे, रु.१० लक्ष. | वॉर्ड क्र.१३, भिमनगर (उत्तर), भावसिंगपूरा येथील सर्वे नं.३२/१, मधील |

| | |
|---|---|
| वॉर्ड क्र.१३, भिमनगर (उत्तर), भावसिंगपूरा अंतर्गत पेठेनगर येथील विविध ठिकाणी रस्त्याचे डांबरीकरण करणे, रु.१० लक्ष. | मनपाच्या आरक्षित केलेल्या ७ एकर जागेपैकी २ एकर जागेवर भिमा कोरेगांव येथे असलेल्या विजयस्तंभाची प्रतिकृती उभारण्याकरीता र.रु.३० लक्ष. |
| वॉर्ड क्र.१३, भिमनगर (उत्तर), भावसिंगपूरा अंतर्गत गट क्र.२७ मधील विविध ठिकाणी रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे, रु.१० लक्ष | |

**सुचक:-** श्रीमती आशा विजय निकाळजे **अनुमोदक:-** श्री.गजानन भानुदास मनगटे

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर. नियमानुसार कार्यवाही करावी.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पामधील खालील कामाचे लेखाशिर्ष बदलण्यास व करावयाच्या कामास नियमानुसार मंजुरी देण्यात येते.

| रद्द करावयाची कामे | करावयाची कामाचे नाव |
|---|---|
| वॉर्ड क्र.१३, भिमनगर (उत्तर), भावसिंगपूरा अंतर्गत मनपा शाळेजवळील गल्लीतील विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन बदलणे, रु.१० लक्ष. | वॉर्ड क्र.१३, भिमनगर (उत्तर), भावसिंगपूरा येथील सर्वे नं.३२/१, मधील मनपाच्या आरक्षित केलेल्या ७ एकर जागेपैकी २ एकर जागेवर भिमा कोरेगांव येथे असलेल्या विजयस्तंभाची प्रतिकृती उभारण्याकरीता र.रु.३० लक्ष. |
| वॉर्ड क्र.१३, भिमनगर (उत्तर), भावसिंगपूरा अंतर्गत पेठेनगर येथील विविध ठिकाणी रस्त्याचे डांबरीकरण करणे, रु.१० लक्ष. | |
| वॉर्ड क्र.१३, भिमनगर (उत्तर), भावसिंगपूरा अंतर्गत गट क्र.२७ मधील विविध ठिकाणी रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे, रु.१० लक्ष | |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ८५१:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, अर्थसंकल्प सन २०१६-१७ मध्ये वॉर्ड क्र.१०, रोजेबाग अंतर्गत असलेल्या विकास कामांचे लेखाशिर्ष खालीलप्रमाणे बदलणे आवश्यक आहे.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | अर्थसंकल्प सन २०१६-१७ मधील लेखाशिर्ष | नवीन कामांचे लेखाशिर्ष |
|---|---|---|
